दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ८ वे I पाने ८ I मुल्य रू. ५.०० I अंक २१ I शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

ओबीसी आरक्षणासह होणार जि. प. निवडणुका

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मार्ग मोकळा; २० जिल्हा परिषदा, २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका घेतली असून, ओबीसी आरक्षणासह प्रलंबित निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अंतरिम व्यवस्था म्हणून उर्वरित निवडणुका घेता येतील; मात्र त्या प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

प्रलंबित जि. प. निवडणुका

कोकण विभाग : पालघर, ठाणे

उत्तर महाराष्ट्र : नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर

मराठवाडा : बीड, जालना, नांदेड, हिंगोली

विदर्भ : अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर

सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान प्रलंबित निवडणुकांच्या अधिसूचना न काढण्याचे समर्थन होऊ शकत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. निवडणुका घेण्यासाठी राज्य सरकारने निवडणूक आयोगाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, तसेच आयोग आणि राज्य सरकारने निवडणुका घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही देण्यात आले.

वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, यापूर्वी १२ जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. उर्वरित निवडणुकाही यापूर्वी राबविलेल्या प्रक्रियेप्रमाणे घेण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. ओबीसी आरक्षणाची टक्केवारी आणि ५० टक्क्यांच्या आरक्षणाची मर्यादा यासंबंधीचे प्रश्न अंतिम सुनावणीत निकाली निघणार आहेत.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी लोकशाही प्रक्रिया का थांबवावी, असा सवाल उपस्थित करत प्रलंबित निवडणुका अंतरिम व्यवस्थेनुसार घेता येतील, असे नमूद केले. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या पुढील कार्यक्रमाकडे राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

सुरभी हॉस्पिटलमध्ये कोट्यावधींचा आर्थिक गैरव्यवहार

संचालक डॉ. राकेश गांधींसह इतरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील छत्रपती संभाजी नगर रोडवरील सुरभी हॉस्पिटल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत संचालक पदाचा गैरवापर करून बनावट कागदपत्रे तयार करत सुमारे २ कोटी ७४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी संचालक डॉ. राकेश कांतीलाल गांधी व इतर जणांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अमित रशिकलाल कोठारी (रा. माणिकनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, संचालक मंडळाच्या ठरावानुसार घेतलेल्या फॉरेनची ऑडिटमध्ये कंपनीत मोठे आर्थिक गैरव्यवहार उघडकेस आले आहेत. कंपनीच्या सुरुवातीच्या कार्यकाळात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर जयेश चावडा अँड कंपनीमार्फत फॉरेनची ऑडिट करण्यात आले होते. या ऑडिटमध्ये आयपीडी विभागातील २३० रुग्णांच्या उपचारांची नोंद कंपनीच्या हिशोबात न दाखवता सुमारे २ कोटी ३० लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. तसेच रुग्णांकडून स्वीकारलेली ४४ लाखांची रक्कम तत्कालीन संचालक डॉ. राकेश कांतीलाल गांधी यांनी स्वतःकडे ठेवून तिचा वैयक्तिक स्वार्थासाठी गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

याशिवाय कोणतीही प्रत्यक्ष सेवा न देता समृद्धी हेल्थकेअर या फार्म सोबत परस्पर सामंजस्य करारनामा करून कंपनीच्या भागधारकांची दिशाभूल करण्यात आली व आर्थिक लाभ लाटण्यात आला. संचालक मंडळाच्या चौकशीची कुंणकण लागतात आरोपींनी कंपनीचे महत्त्वाचे दस्तऐवज आणि रेकॉर्ड स्वतःच्या ताब्यात घेऊन फौजदारी कृत्याचे पुरावे नष्ट केल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी संचालक राकेश गांधी व इतरांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

शिंगवे ग्रामपंचायतचा कर्मचारी विजेच्या धक्क्याने गंभीर जखमी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : राहाता तालुक्यातील शिंगवे गावात ग्रामपंचायतच्या वतीने दिवाळी निमित बल्प लावण्यासाठी पोलवर चढलेल्या एका कर्मचाऱ्याच्या जीवावर चांगलाच बेतला असून ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाची गंभीर बाब समोर आली आहे.

शिंगवे ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा कर्मचारी पांडुरंग रावसाहेब शेळके हा तरुण दिवाळी निमित्त ग्रामपंचायत मार्फत गावात बसवण्यात येणाऱ्या विद्युत खांबावरील लाईट बदलण्याचे काम करत असताना अचानक विद्युत प्रवाह आल्याने पोलवरून खाली पडून गंभीररित्या

भाजला. ही धक्कादायक घटना काल दिनांक २९ रोजी घडली. ग्रामपंचायत शिपाई जालिंदर निकोले आणि पांडुरंग शेळके हे दोघेही दुपारी एक वाजेच्या सुमारास गावातील इलेक्ट्रिक खांबावरील बल्ब बदलण्याचे काम करत होते. त्यावेळी गंभीर घटना घडली. जखमी पांडुरंग शेळके याला तातडीने शिर्डी येथील साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल केले, मात्र तेथे बर्निंग वार्ड नसल्याने त्याच्यावर तेथे उपचार होऊ शकले नाहीत, त्यामुळे त्याला तातडीने लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून सध्या तेथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत . त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

पाणी पुरवठा कर्मचाऱ्याचे काम पाणी पुरवठा सांभाळणे हे असताना त्याला विद्युत खांबावर चढवून जीव धोक्यात घालणे हे ग्रामपंचायत प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरण...

मीनाक्षी शिंदेंचा महिला आघाडी प्रमुखपदाचा राजीनामा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

ठाणे : ठाकरे गटाच्या शिवसेनेचे ठाण्यातील विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणाला एक महिना उलटूनही संशयित सूत्रधाराला अटक का झाली नाही, असा सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी करत त्यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली. पोलिसांसमोर पुरावे असतानाही कारवाई होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून आपली भूमिका स्पष्ट केली. आपल्याशी संबंध नसलेल्या प्रकरणात नाव जोडून पक्ष नेतृत्वावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी पत्रात केला आहे. नेतृत्वाचा सन्मान आणि पक्षाची प्रतिष्ठा जपण्यासाठी राजीनामा देत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या प्रकरणात मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांची चौकशी झाल्याचे सांगण्यात येत आहे. पूर्णेकर कुटुंबीयांकडून दोघांच्या अटकेची मागणी केली जात आहे. मात्र, मीनाक्षी शिंदे यांच्यावर पक्षाकडून कारवाई झालेली नसून त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला आहे. राजीनाम्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, हत्या प्रकरणाच्या तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

'मास्टरमाइंडला वाचवले जात असल्याचा आरोप

प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येला महिना उलटूनही मुख्य सूत्रधाराला अटक का होत नाही, असा प्रश्न उपस्थित करत आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले. मीनाक्षी शिंदे यांना वाचवण्यासाठी यंत्रणा कामाला लावली आहे का, असा सवालही त्यांनी केला.

विधान परिषदेचा कौल : सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षणाचा इशारा !

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन, तर महायुतीने दोन जागा जिंकत आपापले राजकीय बळ दाखवले. जवळपास ४५ तास चाललेल्या मतमोजणीनंतर स्पष्ट झालेल्या या निकालाने राज्याच्या राजकारणात नवे संकेत दिले आहेत. या निवडणुकीकडे केवळ पाच जागांच्या विजय-पराभवाच्या गणितातून पाहणे चुकीचे ठरेल. कारण या निकालात उमेदवारांची विश्वासार्हता, पक्षांची संघटनात्मक ताकद, स्थानिक राजकीय समीकरणे आणि सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीविषयीचे मत अशा अनेक बाबींचे प्रतिबिंब दिसते.

भाजपने तीन जागांवर उमेदवार उभे केले; मात्र पुणे शिक्षक मतदारसंघातील कौस्तुभ गावडे यांच्या विजयावरच समाधान मानावे लागले. पुणे आणि नागपूर या महत्त्वाच्या मतदारसंघांत पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. सत्तेतील सहभाग, संघटनात्मक ताकद आणि निवडणूक यंत्रणा असूनही विजयाची हमी मिळत नाही, हा या निकालाचा भाजपसाठी महत्त्वाचा संदेश आहे. विशेषतः पदवीधर मतदारसंघांतील पराभवाचे विश्लेषण पक्षाने गांभीर्याने करायला हवे. सुशिक्षित मतदारांपर्यंत पोहोचताना केवळ राजकीय प्रभाव नव्हे, तर प्रश्नांची जाण आणि विश्वासार्ह पर्यायही महत्त्वाचा ठरतो.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने लढवलेल्या दोन्ही जागांवर विजय मिळवला. पुणे पदवीधर मतदारसंघात हर्षदा देशमुख-जाधव आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाने पक्षाला राजकीय बळ मिळाले. मर्यादित जागा लढवून सर्व जागांवर विजय मिळवणे ही पक्षासाठी सकारात्मक बाब असली, तरी या यशाचे राज्यव्यापी जनसमर्थनात रूपांतर करण्यासाठी सातत्यपूर्ण संघटनात्मक काम आवश्यक आहे.

नागपूर पदवीधर मतदारसंघातील काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांचा विजयही लक्षवेधी आहे. भाजपचा प्रभाव मानल्या जाणाऱ्या विदर्भातील या निकालामुळे विरोधकांना राजकीय अवकाश उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. मात्र, एका मतदारसंघातील विजयावरून संपूर्ण प्रदेशाचा राजकीय कल ठरवता येणार नाही. त्यासाठी व्यापक राजकीय परिस्थितीचे विश्लेषण आवश्यक आहे.

अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेच्या किरण सरनाईक यांनी विजय मिळवला, तर पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी झाले. या निकालांनी शिक्षक मतदारसंघांतील स्थानिक समीकरणांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक आणि पदवीधर मतदार हे केवळ राजकीय पक्षांच्या घोषणांवर मतदान करत नाहीत; शिक्षणव्यवस्था, रोजगार, प्रशासन, व्यावसायिक प्रश्न आणि प्रतिनिधींची उपलब्धता यांचाही त्यांच्या निर्णयावर प्रभाव असू शकतो.

या निवडणुकीतून महायुतीने विजयाच्या संख्येपलीकडे जाऊन पराभवाची कारणे तपासली पाहिजेत. त्याचवेळी महाविकास आघाडीने मिळालेल्या यशाला अंतिम राजकीय विजय समजण्याऐवजी मतदारांचा विश्वास टिकवण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. विधान परिषद निवडणुका आणि सार्वत्रिक निवडणुका यांचे मतदार, मुद्दे आणि राजकीय संदर्भ वेगवेगळे असतात. त्यामुळे या निकालावरून आगामी निवडणुकांचे निष्कर्ष आधीच काढणे घाईचे ठरेल.

लोकशाहीत विजय हा उत्सवासाठी, तर पराभव हा आत्मपरीक्षणासाठी असतो. पाच जागांच्या निकालाने कोणत्याही पक्षाला कायमस्वरूपी विजयाचे प्रमाणपत्र दिलेले नाही. मतदारांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा, दिलेली आश्वासने पूर्ण करणारा आणि जनतेशी सातत्याने संवाद साधणारा पक्षच भविष्यात आपले स्थान मजबूत करू शकतो. निकालाचा खरा अर्थ हाचराजकारणात सत्ता महत्त्वाची असली, तरी जनतेचा विश्वास त्याहून मोठा असतो.

श्रीरामपूरला समरसता साहित्य मंडळातर्फे एक नोव्हेंबर रोजी कविसंमेलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : श्रीरामपूर तालुका समरसता साहित्य मंडळातर्फे रविवार दि. ०१ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ०२ वाजता श्रीरामपूर मेनरोड आगाशे सभागृहात कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उत्तर अहिल्यानगर जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, साहित्यिक वसंतराव कदम यांनी दिली.

सर्व साहित्यिकांचा पहिलाच ऐतिहासिक प्रत्यक्ष स्नेहमिलन व परिचय मेळावा होत आहे. आपली माणसं ... आपले शब्द हे अतिशय मौलिक असतात. समरसता ही आपली जीवनऊर्जा आणि राष्ट्रभक्तीसाठी महत्त्वाची आहे. ही भूमिका मांडणारे हे काव्य व्यासपीठ आहे. साहित्य हे समाज जोडणारा पूल आहे. धर्म, जात, पंथ, वर्ग, भेद विसरून सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक समरसता निर्माण केली पाहिजे. कवी कवयित्री हे आपली स्वरचित कविता किंवा आपले साहित्य चिंतन ३ ते ५ मिनिटात सादर करणार आहेत. समरसता विचारमंथन आणि भविष्यातील विकासात्मक दिशा व्यक्त करणारे हे काव्य व्यासपीठ आहे. कवी कवयित्रींनी याप्रसंगी उपस्थित राहवे असे संयोजकांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

घरी सोडण्याच्या बहाण्याने रिक्षा चालकाकडून महिलेवर अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर , : घरगुती वादातून घराबाहेर पडलेल्या महिलेला घरी सोडण्याचे आश्वासन देत ऑटोरिक्षात बसवले. मात्र, तिला निर्जनस्थळी नेऊन जिवे मारण्याची धमकी देत अत्याचार केल्याची धक्कादायक घटना वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जांबरगावजवळ घडली. पीडित महिलेने प्रसंगावधान राखत आरोपीच्या तावडीतून सुटका करून घेतली आणि चहाच्या टपरीवर जाऊन पोलिसांना माहिती दिली. महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला छत्रपती संभाजीनगर परिसरात पती आणि दोन मुलांसह राहते. सोमवारी (दि. २६) संध्याकाळी घरगुती कारणावरून पतीसोबत वाद झाल्यानंतर ती रागाच्या भरात घराबाहेर पडली. गंगापूरच्या दिशेने जाताना ऑटोरिक्षाने ती कायगाव येथे पोहोचली. तेथील रामेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ ती बराच वेळ बसून होती.

रात्री अकराच्या सुमारास एका तीन आसनी ऑटोरिक्षाचालकाने तिची विचारपूस केली. महिलेने जोगेश्वरीजवळील रांजणगाव येथे सोडण्यास सांगितल्यानंतर चालकाने तिला घरी पोहोचविण्याचे आश्वासन देत रिक्षात बसवले. मात्र, रिक्षा अपेक्षित मार्गाने जात नसल्याचे महिलेच्या लक्षात आले. विचारणा केल्यावर चालकाने हा शॉर्टकट असल्याचे सांगितले. मंगळवारी पहाटे तीनच्या सुमारास चालकाने रिक्षा निर्जनस्थळी थांबवून महिलेला जिवे मारण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून देण्याची मागणी करत तिचा गळा पकडला. मात्र, महिलेने त्याच्या हाताला हिसका देत तेथून पळ काढला. मुख्य रस्त्यावरील चहाच्या टपरीवर पोहोचून तिने तेथील व्यक्तीला पोलिसांना कळविण्यास सांगितले. माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत महिलेला पोलीस ठाण्यात आणले. आरोपीच्या शोधासाठी महिलेने दिलेल्या वर्णनाच्या आधारे तपास सुरू आहे. संबंधित रिक्षा काळ्या रंगाची असून त्यावर पिवळा पट्टा असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

अहिल्यानगरच्या संतांची गोदावरी परिक्रमा सुरू, ४० साधकांचा सहभाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख कीर्तनकार, संत आणि साधकांनी श्री गोदावरी मातेच्या पवित्र परिक्रमा यात्रेला सुरुवात केली आहे. नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथील ऐतिहासिक सिद्धेश्वर मंदिरात गंगापूजन व संकल्प करून या यात्रेचा भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. या परिक्रमेत सुमारे ४० साधक सहभागी झाले आहेत.

गंगापूजनानंतर साधकांनी श्री क्षेत्र देवगड व नेवासा येथे दर्शन घेतले. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा करून गोदावरी नदीच्या उत्तर तटाने परिक्रमेचा प्रवास सुरू केला. सुमारे १५ ते २० दिवस चालणारी ही यात्रा तेलंगणा व आंध्र प्रदेशातून पुढे जाऊन गोदावरी नदीच्या समुद्रसंगमापर्यंत पोहोचेल. त्यानंतर दक्षिण तटाने परतीचा प्रवास करून प्रवरासंगम येथे यात्रेची सांगता होणार आहे. देवगड संस्थानचे महंत भास्करगिरी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज आणि नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे महंत देविदास महाराज म्हस्के यांनी साधकांना सदिच्छा दिल्या. ब्रह्मानंद स्वामी महाराज, भगवानजी महाराज जंगले शास्त्री, हरि महाराज वाकचौरे, सुदाम महाराज आदमने यांच्यासह जिल्ह्यातील अनेक संत व कीर्तनकारांचा यात्रेत समावेश आहे. परिक्रमेदरम्यान पहाटे गोदावरी स्नान, आरती, काकडा भजन, नामजप, हरिपाठ, कीर्तन आणि सायंकाळी आरतीसह प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. नदीचे पावित्र्य जपणे, जलसंवर्धन आणि नदी स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पैठण येथे परिक्रमावासीयांचे स्वागत

श्री क्षेत्र पैठण येथे परिक्रमावासीयांचे संत एकनाथ महाराज संस्थान व संत मंडळींच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गीता मंदिराचे अध्यक्ष विष्णू महाराज जगताप यांच्यासह उपस्थितांनी गोदावरी परिक्रमेचा संकल्प व्यक्त केला. नांदेड जिल्ह्यातील साध्वी मुक्तिनाथ आईसाहेब यांनीही अनुयायांसह परिक्रमा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

अंगणवाडी सेविकांनी प्रबोधन करण्याची गरज : न्यायाधीश कळमकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना खूप महत्त्व असून जिथे नारीचे पूजन होते तिथे देव सुद्धा वास्तव करतात नारीला सन्मान दिला जातो. महिलांनी महिलांसाठी उभे राहायला हवे सध्या स्त्री भ्रूणहत्या खूप ज्वलंत विषय असून मुलीचे प्रमाण खूप कमी आहे .अंगणवाडी सेविकांनी जास्तीत जास्त ठिकाणी प्रबोधन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन गंगापूर येथील सह दिवाणी न्यायाधीश कनीष्ठ स्तर अनीकेत कळमकर यांनी आयोजित कायदेविषयक शिबिरात केले. तालुका विधी सेवा समिती, गंगापूर यांच्या वतीने २९ ऑक्टोबर रोजी गंगापूर येथील पंचायत समिती सभागृहात कायदेविषयक शिबिर उत्साहात पार पडले. गंगापूर येथील सह दिवाणी न्यायाधीश कनीष्ठ स्तर अनीकेत कळमकर,दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनीष्ठ स्तर निखील हेमने यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनामुळे शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले.यावेळी सह दिवाणी न्यायाधीश कनीष्ठ स्तर अनीकेत कळमकर बोलत होते.

नायगावात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर - तालुक्यातील नायगाव जुने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्याच्या निमित्ताने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, तर माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते पुन्हा एकदा दृढ झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. या मेळाव्यामुळे शाळा, शिक्षक, पालक आणि माजी विद्यार्थी यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली. विद्यार्थी मेळाव्यातून माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रविण बोर्डे उपाध्यक्ष सागर नजन कोषाध्यक्ष अविनाश राशीनकर सचिव शाकीर शेख शैक्षणिक सल्लागार सदस्य म्हणून रेहाना मुजावर शेख ॲड संदीप लांडे डॉ प्रकल्प राशीनकर डॉ संदीप लांडे यांची निवड झाली माजी विद्यार्थी संघाचे सदस्य म्हणून महेश लांडे सतिश लांडे किरणकुमार लांडे सागर लांडे गोरख राशिनकर नवनाथ राशिनकर सोमनाथ राशिनकर यांची निवड करण्यात आली. माजी विद्यार्थी संघाच्या नूतन कार्यकारिणीचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला त्यानंतर माजी विद्यार्थ्यांसाठी संगीत खुर्ची फुगे फोडणे टिकली लावणे यांसारख्या मनोरंजक खेळाचे आयोजन करण्यात आले. यावेळेस माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी जवळपास २१ हजार रुपयांची देणगी जमा केली. कार्यक्रमासाठी महेश लांडे सागर नजन किरणकुमार लांडे अविनाश राशीनकर प्रकल्प राशीनकर प्रविण बोर्डे गोरख राशिनकर नवनाथ राशिनकर सतीश लांडे सचिन लांडे सोमनाथ राशिनकर नवनाथ राशिनकर सागर लांडे रविंद्र लांडे किरण दातीर अरुण भारसाकळ अशोक बोर्डे रमाकांत लांडे उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी संघ, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक यांच्या सहकार्याने करण्यात आले. नायगाव जुने येथील माजी विद्यार्थी मेळावा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

जिल्हा बँकेच्या तारण कर्जाचा प्रश्न सोडवा; शेतकऱ्यांना प्रतिटन ५ हजार रुपये ऊसदर द्या-नरेंद्र पाटील काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : राज्यात २०२६-२७ चा ऊस गाळप हंगाम सुरू झाला असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यंदा किती दर मिळणार, याबाबत स्पष्टता नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. साखर कारखान्यांना साखर तारण कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणींचा विचार करून केंद्र व राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा. लागू नियमांनुसार साखर विक्रीसाठी आवश्यक परवानगी व प्रक्रिया सुलभ करून शेतकऱ्यांना प्रतिटन ५ हजार रुपये ऊसदर देण्याबाबत कारखान्यांनी सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी भारतीय किसान श्रमिक जनशक्ती युनियनचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष नरेंद्र पाटील काळे यांनी केली आहे.

साखर कारखान्यांना साखर विक्रीबरोबरच मळी, इथेनॉल, सहवीज निर्मिती आणि प्रेसमड यांसारख्या उपउत्पादनांतूनही उत्पन्न मिळते. त्यामळे कारखान्यांनी सर्व उत्पन्न, उत्पादन खर्च, कर्जावरील व्याज आणि इतर आर्थिक दायित्वांचा पारदर्शक हिशेब मांडून शेतकऱ्यांना अधिक दर देण्याची क्षमता स्पष्ट करावी.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून साखर तारण कर्ज उपलब्ध होण्यात अडचणी येत असल्यास संबंधित कारखान्यांची वस्तुस्थिती तपासून शासनाने योग्य तोडगा काढावा. लागू नियमांच्या अधीन राहून साखर विक्रीसाठी आवश्यक परवानगी मिळाल्यास कारखान्यांना खेळते भांडवल उपलब्ध होण्यास मदत होऊ शकतेया निधीतून शेतकऱ्यांची देयके प्राधान्याने अदा करण्यासाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी काळे पाटील यांनी केली आहे.

गाळप हंगाम सुरू होऊन १४ दिवस उलटल्याचा दावा करत दोन्ही नेत्यांनी ऊसदर जाहीर करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना ऊसतोडणी, वाहतूक, मजुरी आणि पुढील शेती हंगामासाठी मोठ्या खर्चाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत ऊसदर व देयकांबाबत अनिश्चितता कायम राहणे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवणारे आहे.

कारखान्यांनी लागू कायद्यानुसार एफआरपीची रक्कम विहित मुदतीत अदा करावी. शेतकऱ्यांच्या देयकांतून कोणतीही अनधिकृत कपात करू नये आणि देयकांचे वेळापत्रक स्पष्ट करावे. शासनानेही साखर विक्री, तारण कर्ज आणि शेतकऱ्यांच्या देयकांच्या प्रश्नावर तातडीने निर्णय घ्यावा या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा नरेंद्र काळे पाटील यांनी दिला आहे.

वै.बन्सी महाराज तांबे विद्यालयातील १५१ विद्यार्थ्यांनी घेतला ज्ञानेश्वरी वाचनाचा आनंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील रांजणगाव देवी येथील वै.बन्सी महाराज तांबे विद्यालयातील १५१ विद्यार्थ्यांनी अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचनाचा आनंद घेतला. रांजणगाव देवी येथे प्रतिवर्ष प्रमाणे वैकुंठवाशी ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांच्या ३२ व्या पुण्यतिथी २४ ऑक्टोबर पासून अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण अतिशय आध्यात्मिक वातावरणामध्ये सूरु आहे.

संत श्रेष्ठ नामदेव महाराजांच्या'' ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी एक तरी ओवी अनुभवावी'' या उक्तीप्रमाणे वै.बन्सी महाराज तांबे माध्यमिक विद्यालयातील १५१ विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरी पारायण मध्ये सहभाग घेऊन ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन करून पारायण सप्ताहचा आनंद घेतला. भविष्यामध्ये ज्ञानेश्वरी वाचन हे अतिशय महत्त्वाचे असल्यामुळे विद्यार्थ्यांना आत्तापासूनच ज्ञानेश्वरी विद्यार्थ्यांना अध्यात्माची गोडी लागावी म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब पंडित, अनिल महाराज चौधरी, बाळासाहेब महाराज गाडेकर, पोपटराव महाराज जावळे व सावता मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरी वाचनाचा आनंद घेतला आहे.

आज पुण्यतिथी सोहळा...

रांजणगाव देवी हे गाव वैकुंठवासी बन्सी महाराज तांबे यांचीही जन्मभूमी आहे. आज शुक्रवार दि.३० ऑक्टोबर रोजी त्यांची ३२ व्या पुण्यतिथी असून त्यानिमित्त हा अखंड हरिनाम सप्ताह सूरु आहे. महेश महाराज पेहेरे यांच्या अमृतमय वाणीतून संत चरित्र कथा सूरु आहे.शनिवार दि. ३१ रोजी सकाळी ९ वाजता भागवताचार्य नाना महाराज सूर्यवंशी (श्रीक्षेत्र आळंदी) यांचे काल्याचे किर्तनाने या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होईल.

बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी ४०० कामगार मुंबईकडे रवाना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : बांधकाम कामगारांना दिवाळी भेट म्हणून प्रत्येकी २० हजार रुपये द्यावेत, तसेच बंद झालेले कल्याणकारी योजनांचे लाभ तातडीने सुरू करावेत, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या सौ. रोहिणीताई शंकरराव आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी राहुरी येथून सुमारे ३०० ते ४०० बांधकाम कामगार मुंबईकडे रवाना झाले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून नोंदणीकृत कामगारांना मिळणारे आर्थिक अर्थसहाय्य, आरोग्य विमा, मुलांच्या शिक्षणासाठीचे अर्थसहाय्य यांसह विविध योजनांचे लाभ बंद झाल्याने कामगारांमध्ये नाराजी आहे. हे लाभ पूर्ववत सुरू करून कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनातून करण्यात येत आहे.

कामगार नेते डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली

अकोले ते मुंबई वाहन मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचे आरोग्य विमा संरक्षण, मुलांना शिष्यवृत्ती तसेच वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांना कोणत्याही अटीशिवाय दरमहा पाच हजार रुपये पेन्शन द्यावी, अशा मागण्यांचाही यात समावेश आहे. कामगारांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन सौ. रोहिणीताई आंबेकर यांनी केले आहे.

शिर्डीत एकता मंडळाच्या पुनर्जीवनाची नांदी

कोजागिरी पौर्णिमा साजरी करत एकजुटीचा जाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : दत्तनगर परिसरात जवळपास दहा वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर यंदाची कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात, आनंदात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत साजरी करण्यात आली. या निमित्ताने एकता तरुण मंडळाच्या जुन्या आणि नव्या पिढीतील जवळपास सत्तर ते ऐंशी सभासद एकाच ठिकाणी एकत्र आल्याने केवळ एक सण साजरा झाला नाही, तर अनेक वर्षांपासून शांत असलेल्या मंडळाच्या पुनर्जीवनाची चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. चंद्राच्या शीतल प्रकाशात, दुधाच्या गोडव्यासोबत आणि जुन्या आठवणींच्या उजाळ्यासह साजरा झालेला हा सोहळा शिर्डीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात नव्या पर्वाची सुरुवात करणारा ठरला आहे.

एक काळ असा होता, जेव्हा एकता तरुण मंडळ हे नाव शिर्डीत केवळ एका मंडळापुरते मर्यादित नव्हते, तर ते एका चळवळीचे प्रतीक बनले होते. मंडळाच्या वैभवशाली इतिहासातील त्या सोनेरी आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. प्रत्येकाच्या सुखदुःखात कार्यक्रम संपेपर्यंत सर्व कार्यकर्ते जीवाचे रान करून झटून काम करत असत, हे मंडळाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होते. कोणताही कार्यक्रम असो, तो शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडणे आणि शेवटच्या कार्यकर्त्यापर्यंत सर्वांनी एकत्र राहणे हीच मंडळाची खरी ओळख होती. रक्तदान शिबिरांसारख्या सामाजिक उपक्रमांपासून ते गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, होळी, रंगपंचमी, दहीहंडी आणि कोजागिरी पौर्णिमेसारख्या धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवांपर्यंत मंडळाने अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबवले होते. केवळ उत्सव साजरे करणे एवढ्यापुरतेच मंडळाचे कार्य मर्यादित नव्हते, तर समाजप्रबोधनासाठी सार्वजनिक वाचनालयही मंडळाने सुरू केले होते, ज्याचा लाभ परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना आणि वाचकांना झाला. या कार्यामुळे शिर्डीत मंडळाच्या तीन ते चार शाखाही स्थापन झाल्या होत्या आणि मंडळाचे कार्यक्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत होते.

मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे गेल्या काही वर्षांमध्ये मंडळाचे सार्वजनिक कार्यक्रम बंद झाले होते. काळाच्या ओघात कार्यकर्ते विखुरले गेले, नवीन पिढीला मंडळाच्या कार्याची फारशी ओळख राहिली नाही आणि त्यामुळे एकेकाळी गजबजलेला दत्तनगर परिसर शांत झाला होता. तरीही जुन्या कार्यकर्त्यांच्या मनात मंडळाबद्दलची ओढ आणि आपुलकी कायम होती. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने हीच ओढ पुन्हा एकदा सर्वांना एकत्र घेऊन आली. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या जेष्ठ आणि नव्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमाला मनापासून पाठिंबा देत शुभेच्छा दिल्या आणि मंडळ पुन्हा एकदा सक्रिय व्हावे अशी भावना व्यक्त केली.

या सोहळ्यात केवळ गप्पा आणि आठवणींना उजाळा देण्यात आला नाही, तर पुढील वाटचालीबाबतही मनमोकळी चर्चा झाली. जुन्या पिढीचा अनुभव आणि नव्या पिढीचा उत्साह यांची सांगड घातल्यास मंडळ पुन्हा एकदा त्याच जोमाने उभे राहू शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. एकता तरुण मंडळ पुन्हा सक्रिय झाल्यास शिर्डीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात होऊ शकते, अशी भावना सर्वच उपस्थितांनी व्यक्त केली. दत्तनगर येथे साजरी झालेली ही कोजागिरी पौर्णिमा केवळ एका रात्रीपुरती मर्यादित न राहता, ती एकतेच्या, मैत्रीच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या नव्या अध्यायाची सुरुवात ठरावी, अशी अपेक्षा आता सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

दखल

डॉ. प्रवीण गुंजाळ यांना विक्रांत विद्यापीठाची पीएचडी प्रदान

संगमनेर : शहराला लागत असणाऱ्या गुंजाळ नगर येथील डॉ प्रवीण काशिनाथ गुंजाळ यांना मध्यप्रदेश राज्यातील विक्रांत विद्यापीठाच्या वतीने पी एच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. प्रवीण काशीनाथ गुंजाळ यांनी वाढत्या शहरी तापमानावर नियंत्रण मिळविण्यासाठी 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' कमी करण्याच्या दृष्टीने काचेची पावडर व झिओलाइटचा वापर करून पर्यावरणपूरक आणि शाश्वत बांधकाम साहित्य विकसित करण्यावर संशोधन केले. या त्यांच्या संशोधनाची विक्रांत विद्यापीठाने दखल घेऊन त्यांना पीएचडी प्रदान केली आहे. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

ज्ञानमाता विद्यालय ते पंचायतसमिती अतिक्रमणे नगरपालिकेने हटविली

संगमनेर : संगमनेर शहरातील दिल्ली नाकाते ज्ञानमाता विद्यालय पंचायत समिती कार्यालयाच्या राज्य महामार्गालगत केलेली अनाधिकृत अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात यावी अशी मागणी युवा सेनेच्या वतीने करण्यात आली होती या मागणीची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण विरोधी मोहीम राबवून जेसीबीच्या साह्याने राज्य महामार्गालगत दुकाने पत्राशेड आणि हातगाड्या ही सर्व अतिक्रमणे हटविली. त्यामुळे राज्य मार्गावरील वाहतुकीला होणारा अडथळा दूर होण्यास मदत झाली आहे. संगमनेर शहरातील कोल्हार-घोटी राज्य महामार्गालगत दिल्ली नाका ते ज्ञानमाता हायस्कूल परिसरापर्यंत अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाली होती. यामध्ये गॅरेज, टायर पंक्चरची दुकाने, चहा-पान स्टॉल,सह विविध प्रकारचे पत्राशेड तसेच हातगाड्यांचा समावेश होता. या भागामध्ये राज्य महामार्ग लगतच अतिक्रमण केले असल्यामुळे वाहतुकीला अडथळा होत होता त्यामुळे युवा सेनेचे उप जिल्हा प्रमुख सौरभ देशमुख तालुका प्रमुख सुशील शेवाळे शहर प्रमुख सार्थक शेवाळे यांच्यासह युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी या भागातील अतिक्रमणे हटविण्याची मागणी मुख्याधिकारी दयानंद गोरे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना निवेदन देऊन करण्यात आली होती या दोन्ही प्रशासनाने युवा सेनेच्या मागणीची गंभीर दाखल केली अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेतली.मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागप्रमुख पंकज मुंगसे यांच्यासह अतिक्रमणविरोधी पथकानेजेसीबी आणि दोन ट्रॅक्टरच्या मदतीने दिल्ली ज्ञानमाता विद्यालय ते पंचायत समिती पर्यंतची धडक मोहीम राबवत तीन ट्रॅक्टर ट्रॉली भरून साहित्य जप्त करण्यात आले.

राज्यातील १४ हजार ७८७ कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदांना मान्यता

आ. अमोल खताळ पाटील यांच्या मागणीला यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ अविरतपणे आरोग्यसेवा देणाऱ्या राज्यातील १४ हजार ७८७ पात्र कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतन श्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वार्षिक ९८३.८० कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयामुळे गेली दहा वर्षापासून प्रलंबित असलेल्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना बळ मिळाले आहे

आरोग्यविषयक विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णसेवा, माता-बाल आरोग्य, लसीकरण, आरोग्यविषयक जनजागृती तसेच विविध आरोग्य मोहिमांमध्ये हे कर्मचारी सातत्याने कार्यरत असतात. यातील अनेक कर्मचाऱ्यांनी दहा वर्षांहून अधिक काळ सेवा बजावली असतानाही नोकरीतील अनिश्चितता आणि वेतनासंबंधीच्या प्रश्नांमुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे राज्यातील या

कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे किंवा त्यांच्या वेतनात भरीव वाढ करून त्यांना आर्थिक न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार अमोल खताळ पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात करत या महत्त्वाच्या मागणीकडे विधिमंडळाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या अनेक वर्षाच्या मागणीला यश आले असून, कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आमदार अमोल खताळ पाटील यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे विशेष आभार मानले आहेत.

शहरातील विकास कामे केवळ सत्ताधारी गटाकडूनच

विरोधकांनी फुकटचे श्रेय घेऊ नये : डॉ. उषाताई तनपुरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : शहरात जी काही विकास कामे व रस्त्याची कामे सुरु आहेत, ती फक्त सत्ताधारी गटाचा पाठपुरावा व प्रयत्नामुळेच होत आहे. विरोधकांनी कोणत्याही कामाचे श्रेय घेऊ नये. असा सूचक टोला माजी नगराध्यक्षा उषाताई तनपूरे यांनी लगावला.

राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड परिसरात भूमिगत गटारचे काम पूर्ण होऊन आता रस्त्याचे काम सुरु आहे. सदर कामाचा श्रेयवाद सुरु झाला असून माजी नगरसेवक आर आर तनपूरे व विद्यमान नगरसेवक सागर तनपुरे यांच्यात परस्पर विरोधात आरोप प्रत्यारोप होत आहे. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा उषाताई तनपूरे यांनी स्वतः मल्हारवाडी रोड परिसरात जाऊन समक्ष पाहणी केली. यावेळी उषाताई तनपूरे म्हणाल्या कि, नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरात अनेक विकास कामे होत आहे. सध्या रस्त्याची कामे सुरु आहेत. या कामांसाठी सत्ताधारी गटातील नगरसेवकांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नामुळेच रस्त्याची कामे होत आहे. या कामाचे श्रेय विरोधकांनी घेऊ नये. असे मत उषाताई तनपूरे यांनी व्यक्त केले.

यावेळी नगरसेवीका प्रियंका आहेर म्हणाल्या कि, सदर रस्त्याच्या कामासाठी आम्ही वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळेच रस्त्याचे काम होत आहे. आमदार प्राजक्त तनपूरे, उप नगराध्यक्ष हर्ष तनपूरे, माजी नगराध्यक्षा उषाताई तनपूरे यांच्या मार्गदर्शनात आम्ही प्रभागातील प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचा विश्वास प्रियंका आहेर यांनी व्यक्त केला.

प्रसंगी नगरसेवक सागर तनपुरे, नगरसेविका स्मिता भुजाडी, प्रियांका आहेर, रवींद्र आहेर आदिंसह प्रभागातील अनेक नागरिक उपस्थित होते.

शेतकऱ्यांची अडवणूक केल्यास धडक आंदोलन : वहाडणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : परिसरात सोयाबीन पिक तयार झाले असून कापसाची वेचणी सुद्धा सुरू झाली आहे. आर्थिक अडचण असल्यामुळे अनेक शेतकरी आपला माल येथील व्यापाऱ्यांना विकत आहे. व्यापाऱ्यांनी माल खरेदी करतांना जाणीव पूर्वक शेतकऱ्याची अडवणूक केली तर मनसेच्या वतीने धडक आंदोलन करण्यात येईल असा इशारा शेतकरी सेनेचे (मनसे) तालुका अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी दिला आहे. परिसरात पुरेसा पाऊस न झाल्यामुळे सरकारने राहाता तालुक्याचा समावेश दुष्काळ ग्रस्त तालुक्यांच्या यादीत केला आहे. परिसरात खरीप पिकाचे उत्पादन निम्म्याने घटले आहे. शेतमाल विक्रीसाठी शेतकरी वर्गाला पुणतांबा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची शाखा नसल्यामुळे व्यापाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. परिसरात अनेक खाजगी व्यापाऱ्यांनी सोयाबीन व कापूस खरेदी केंद्रे सुरु केली आहे. माल खरेदी करतांना व्यापारीवर्ग माल खराब आहे, माती आहे, काड्या आहेत अशी सबब सांगून कमी दरात मालाची खरेदी करतात. एवढेच नव्हे तर प्रत्येक क्विंटल मागे एक ते दीड किलो पर्यंत कटला वजनातून कमी करतात पुणतांबा येथील व्यापाऱ्यांना याबाबद विचारणा केली असता मालाचा टप केला तर आम्ही वजनात काही ही कपात करत नाही खूपच माती असेल तर वजनात जास्तीत जास्त एक किलो पर्यंत घट धरतो मात्र चांगल्या मालाला चांगला दर देतो असे असले तरी परिसरातील एका सोयाबीन खरेदी केंद्रावर एका शेतकऱ्याचा चांगले सोयाबीन असतांना प्रति क्विंटल दीड किलो कटला केल्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. शेतमालाच्या खाजगी व्यापाऱ्यांच्या खरेदी केंद्रावर कृषी विभागाची देखरेख असते मात्र राहाता तालुक्यातील कृषी विभाग बाजार समितीचे अधिकारी यांचे खाजगी व्यापाऱ्यांच्या खरेदी केंद्रावर नियंत्रण नसल्यामुळे परिसरात व्यापाऱ्यांची सरसिपणे मनमानी व अडवणूक सुरू आहे हे जर थांबले नाही तर मनसेच्या वतीने धडक आंदोलन करण्याचा निर्धारही वहाडणे यांनी व्यक्त केला आहे.

हरेगावातील दूषित पाण्याचा प्रश्न ऐरणीवर; आरोग्य विभागाकडून पाहणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : हरेगाव परिसरातील दूषित पाणी आणि पाणी वितरणाच्या प्रश्नावर आवाज उठवल्यानंतर आरोग्य प्रशासनाने पाहणी केली. गावातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत दवंडी देण्याच्या सूचना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शिंदे यांनी दिल्याची माहिती हरेगाव जनहित विकास समितीचे सुनील शिनगारे यांनी दिली. गावातील पाणीपुरवठ्याची स्थिती गंभीर असल्याने पाण्याचे नमुने तपासणे, जलशुद्धीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या टीसीएलच्या साठ्याची नोंद, त्याचे रजिस्टर तसेच जलसुरक्षकाकडून नियमित क्लोरिनेशन केले जाते का, याची तपासणी करावी, अशी मागणी शिनगारे यांनी केली आहे.

पाणी नमुना नोंदवही अद्ययावत आहे का, नमुने तपासणीसाठी पाठविण्याची प्रक्रिया योग्य प्रकारे होते का आणि यापूर्वी ग्रामपंचायतीला पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणत्या सूचना देण्यात आल्या, याचीही चौकशी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पाणीपुरवठ्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी ग्रामपंचायतीसोबतच संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचीही आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने नियमित तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची माहिती गटविकास अधिकाऱ्यांना दिली असून, लवकरच योग्य कार्यवाही होईल, अशी अपेक्षा सुनील शिनगारे यांनी व्यक्त केली.

वाढदिवसाचा खर्च टाळून पठाण यांनी शाळेला हजारांचा निधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

बालाजी देडगाव : वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत आर. के.ग्रुप च्या संचालिका हसीनाबी लेकत पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा येथे विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी १० हजार रुपयांचा निधी शाळेला सुपूर्द करण्यात आला. पठाण परिवाराच्या या स्तुत्य उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक संभाजी कडू यांनी केले.

यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, केंद्रप्रमुख भास्कर तांबे, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक भाऊसाहेब सावंत आणि पत्रकार युनूस पठाण यांनी मनोगत व्यक्त केले. वाढदिवसानिमित्त शाळेला आर्थिक मदत करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावण्याचा पठाण परिवाराचा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. हसीनाबी पठाण यांचे वाढदिवसानिमित्त अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, अकबरभाई पठाण, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष आकाश चेडे, छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मच्छिंद्र मुंगसे, बन्सी पाटील मुंगसे, बाळासाहेब वांढेकर, बहिरू मुंगसे, भाऊसाहेब चांडे, अविनाश कोकाटे, विकास वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

नेवासा तालुक्यातील सर्व शिक्षक ४ नोव्हेंबरच्या मोर्चात सहभागी होणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली. नेवासा तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीने दि.४ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेवर काढण्यात येणाऱ्या भव्य मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

नेवासा तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीची बैठक बुधवार दि.२८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी नेवासा येथील कै.भा.दा. पाटील गुरूजी सभागृहात संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून प्राथमिक शिक्षकांवर सातत्याने होणारा प्रशासकीय दबाव, ऑनलाइन माहिती भरणे, विविध प्सवर वारंवार माहिती अपलोड करणे, दररोज नवनवीन अहवाल सादर करणे आणि तातडीने माहिती देण्याच्या प्रशासकीय दबावामुळे प्राथमिक शिक्षक प्रचंड मानसिक तणावाखाली काम करत आहेत. शिक्षकांचा बहुतांश वेळ अशैक्षणिक कामांमध्ये जात असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे.

वारंवार मागविण्यात येणारी ऑनलाइन माहिती आणि कारवाईच्या धमक्यांविरोधात अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने बुधवार दि.४ नोव्हेंबर जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चामध्ये नेवासा तालुक्यातील जास्तीत जास्त प्राथमिक शिक्षक बंधू-भगिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन नेवासा तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या बैठकीत करण्यात आले. समन्वय समितीच्या बैठकीला रामेश्वर चोपडे,पांडुरंग काळे,भारत गवळी, कैलास निकम,गणेश शेलार,शरद खरात,किशोर शिंदे, दत्ता चौथे, बापूसाहेब सोनवणे, विठ्ठल काळे,राजे मुंगसे,संतोष रासकर, किरण दहातोंडे, सलीम शेख ,विठ्ठल कांगुणे, संजय लाड ,रामचंद्र निंबाळकर ,निलेश काळे, राहुल लोखंडे ,संजय फासगे,अशोक ढोले, मच्छिंद्र भनगे, दशरथ ढोले ,नामदेव शिरसाठ, संदीप जंगले, प्रशांत पठाडे, शिवनाथ कुसळकर ,कल्याण नेहूल आदि उपस्थित होते.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील शिक्षकांच्या पात्रतेची तपासणी करा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढत असताना या शाळांमध्ये नियुक्त शिक्षकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेची तपासणी करण्याची मागणी पालकवर्गातून होत आहे. पालकांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जात असताना विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते का, याची खातरजमा करण्यासाठी शिक्षण विभागाने नियमित तपासणी करावी. तसेच शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी 'पवित्र पोर्टल'सारख्या गुणवत्ताधारित व्यवस्थेचा विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश शुल्क, शैक्षणिक शुल्क, गणवेश, पुस्तके आणि वाहतूक यांसाठी पालकांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. त्यामुळे नियुक्त शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक प्रशिक्षण, विषयाचे ज्ञान आणि अध्यापन कौशल्ये यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. काही शाळांमध्ये कमी मानधनावर शिक्षक नियुक्त केले जात असल्याची चर्चा असून, संबंधित नियुक्त्यांमध्ये आवश्यक निकषांचे पालन होते का, याची तपासणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

शिक्षण विभागाने इंग्रजी माध्यमाच्या शाळांना नियमित भेटी देऊन शिक्षकांची प्रमाणपत्रे, शाळेची मान्यता, उपलब्ध शैक्षणिक सुविधा आणि अध्यापनाच्या पद्धतींची पडताळणी करावी. विद्यार्थ्यांना शिकवलेले विषय समजतात का, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सुधारणा होते का, याचेही मूल्यमापन करावे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी आहे.

केवळ इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत नाही. विषयांचे आकलन, विचारशक्ती, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करण्याची क्षमता विकसित होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक आणि प्रभावी अध्यापन पद्धती आवश्यक आहेत.

शिक्षक भरतीत पारदर्शकता राखण्यासाठी शासनाने विद्यमान नियम व कायदेशीर तरतुदींचा विचार करून योग्य धोरण ठरवावे. पात्र शिक्षकांची नियुक्ती, नियमित तपासणी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना प्राधान्य देणारी प्रभावी व्यवस्था उभारावी, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे.

गुरुवर्य बन्सी महाराज तांबे यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तन सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

बालाजी देडगाव : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे तांबे वस्ती येथील संत सावता महाराज मंदिर येथे ह.भ.प. गुरुवर्य बन्सी महाराज तांबे यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील ह.भ.प. वारकरी भूषण सोमनाथ महाराज पाटील यांची जाहीर कीर्तन सेवा होणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत हा कीर्तन सोहळा संपन्न होणार आहे. किर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संत सावता महाराज यांच्या चरणी नतमस्तक होऊन संतांच्या विचारांचा व भक्तिमार्गाचा जागर करण्यात येणार आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सविता वसंत श्रीमंदीलकर (लग्नानंतरचे नांव सविता सचिन इंगळे) यांचे पती कै. सचिन ज्ञानदेव इंगळे हे दि.२४/१०/२०२५ रोजी रुबी हॉल क्लीनीक पुणे ता.जि.पुणे येथे मयत झाले आहे. त्यांचे मुळ गाव तरवडी, ता. नेवासा हे आहे. आमचे अशिलांचे पती कै. सचिन ज्ञानदेव इंगळे यांच्या नावे मारुती सुजुकी स्वीफ्ट व्ही.डी.आय. त्याचा रंग पर्लआर्टीक व्हाईट असा आहे. सदर गाडीचा चेसीज नं.MBHCZC03SKC379781 असा असुन इंजिन नं.D13A-0792791 असा आहे. त्याचा आर.टी.ओ. रजि. नं.MH-17-BX2190 डिझल इंधन असलेली वाहन होते व आहे. सदर वाहनाचे नोंदणीकृत मालक हे आमचे अशिलाचे पती कै. सचिन ज्ञानदेव इंगळे असुन सदरचे वाहन आमचे अशिल्न सविता वसंत श्रीमंदीलकर ऊर्फ सविता सचिन इंगळे वय ४० रा. तरवडी, ता. नेवासा जि. अहिल्यानगर यांच्या नावे वारस या नात्याने करावयाचे आहे. सदर वर नमुद वर्णनाचे वाहना सदंर्भात कोणत्याही त्रयस्त इसमाचा, वित्तीय संस्थेचा अगर कुणाचाही काहीएक हक्क हितसंबंध असल्यास त्याबाबत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत पुरक कागदपत्रांसह आमच्या अशिलांची त्याबाबत खात्री पटवुन द्यावी व तशी लेखी हरकत आमचे अशिल अथवा आर.टी.ओ. ऑफिस यांच्याकडे लेखी हरकत सादर करावी. मुदतीत कुणाचीही लेखी हरकत न आल्यास सदर वाहनावर कुणाचाही अधीकार किंवा हरकत नाही. असे समजुन हस्तांतरणाची पुढील कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केली जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.

नेवासा
दिनांक :- ३०/१०/२०२६

ॲड. एन. बी. मते
बी.ए.एलएन.बी, डी.एल.एल. एल. डब्लु.
नेवासा कोर्ट, ता. नेवासा जि. अ. नगर
मो. ९८२२८०७५२८९

त्रिमूर्ती महाविद्यालयाच्या कुस्तीपटूंची सुवर्णभरारी

चार सुवर्णपदके पटकावून खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या मान्यतेने चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर येथे दि २८ व २९ ऑक्टोबर रोजी आयोजित आंतरविभागीय मुलांच्या कुस्ती स्पर्धा पार पडल्या या कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती महाविद्यालयाच्या कुस्तीपटूंनी चार सुवर्णपदके पटकावून सुवर्ण भरारी घेतली खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत अतुल संतोष मोरे याने ६० किलो वजन गट ग्रीको रोमन प्रकारात तर शुभम मनोहर जाधव ७२ किलो वजन गट ग्रीको रोमन मध्ये यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकांची कमाई केली. तसेच मुलींच्या विभागीय स्पर्धा मुकुटराव साहेबराव पवार महाविद्यालय, सोमेश्वरनगर, बारामती या ठिकाणी १३ व १४ ऑक्टोबर रोजी पार पडल्या.

या स्पर्धेत त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी धनश्री हनुमंत फंड हिने ६५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले तर गौरी कानिफनाथ मुखेकर हिने ७२ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले तसेच आर्या गणेश शिंदे हिने ७२ किलो वजन गटात रौप्य पदक पटकावले सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंच्या दैदीप्यमान कामगिरीमुळे चारही खेळाडूंची चंदीगड येथे होणाऱ्या विद्यापीठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी खेळाडूंचे त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगेपाटील, उपाध्यक्षा ड.स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले पाटील,सहसचिव डॉ.श्रुती आमले पाटील,विश्वस्त चेतन चव्हाण पाटील,समन्वयक डॉ. अनुराधा गोरे यांनी अभिनंदन केले आहे.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे कुस्ती प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच संभाजी निकाळजे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.प्राचार्य डॉ. सी. एस आरसुळे उपप्राचार्य प्रा.निकिता बर्गे,श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सोपान काळे ,त्रिमूर्ती सीनियर कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रशांत जायगुडे, महाविद्यालय प्रशासन, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून खेळाडूंना पुढील राष्ट्रीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

जाहीर लिलाव

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, समशेरपूर
ता.अकोले, जि. अहिल्यानगर

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, समशेरपूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील पाच मंजूर निर्लेखित वर्गखोल्यांच्या साहित्याचा जाहीर लिलाव शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता शाळेच्या प्रांगणात करण्यात येणार आहे.

तरी सदर लिलावात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व इच्छुकांनी नियोजित वेळेत शाळेच्या ठिकाणी समक्ष उपस्थित राहावे.

सदर लिलाव शासकीय नियमानुसार व शा.व्य.समितीने निश्चित केलेल्या नियम व अटींनुसार करण्यात येईल. नियम व अटी कार्यालयात पाहवयास मिळतील. सर्व इच्छुकांनी याची नोंद घ्यावी संपर्क अध्यक्ष ९६३७२२६१९३ मुख्याध्यापक ८५३००५१६८७

मुख्याध्यापक	अध्यक्ष	सचिव
जि.प.प्राथ. केंद्रशाळा समशेरपूर ता. अकोले, जि. अहिल्यानगर	शाळा व्यवस्थापन समिती जि.प.प्राथ.शाळा समशेरपूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर	

वैजापूरच्या उसाला दुष्काळाचा फटका ; उत्पादनात ४० टक्के घट

दिपक बरकसे । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : ज्या हिरव्यागार उसाच्या शेतातून शेतकरी वर्षभराच्या उत्पन्नाची स्वप्ने पाहत होता, त्याच उसाची दुष्काळाने वाढ खुंटवली आहे.पावसाने पाठ फिरवली, विहिरींची पाणीपातळी खालावली आणि सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळाले नाही. परिणामी, वैजापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. महिनोन्महिने पीक जोपासूनही अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा मावळू लागली आहे.यंदा तालुक्यात ऊस उत्पादनात सुमारे ४० टक्क्यांची घट झाल्याचा अंदाज असून, दुष्काळाच्या झळा आता साखर कारखानदारीलाही बसू लागल्या आहेत. ऊस हे मोठ्या प्रमाणात पाणी लागणारे पीक आहे. मात्र, पाण्याअभावी यंदा उसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. पाण्याचा ताण बसल्याने कांड्यांची लांबी व जाडी कमी राहिली, फुटव्यांची वाढ खुंटली आणि उसाचे वजन घटले.लागवड ,खते,औषधे आणि मजुरीसाठी खर्च करूनही उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांसमोर खर्च भरून काढण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महालगाव येथील पंचगंगा साखर कारखाना.

भाव देऊन साथ देऊ

"पाणी मिळत नसल्याने ऊस वाळून चालला आहे.त्यात साखर उताराही कमी येत आहे.दुष्काळामुळे पाण्याची परिस्थिती गंभीर बनली आहे.या संकटात शेतकऱ्यांसोबत उभे राहून लढावेच लागेल.ऊसाला चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना साथ देण्याची आमची भूमिका आहे."

प्रभाकर उत्तमराव शिंदे,
चेअरमन, पंचगंगा साखर कारखाना

वजनामुळे शेतकरी –

ऊस वजनातील पारदर्शकतेसाठी पंचगंगा साखर कारखान्याने घेतलेल्या पुढाकाराची दखल आता शासनालाही घ्यावी लागली.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वजनाबाबत विश्वास मिळावा,या उद्देशाने कारखान्याने अन्य ठिकाणीही वजनाची पडताळणी करण्याची भूमिका घेतली आहे.या निर्णयामुळे ऊस वजनातील पारदर्शकतेचा मुद्दा चर्चेत आला असून,शेतकऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून पंचगंगालाच पसंती देत आहे.

गाळप हंगामाबाबत चिंता–

महालगाव येथील पंचगंगा साखर कारखान्यात आतापर्यंत एक लाख ४० हजार मेट्रिक टन उसाचे गाळप झाले आहे. मात्र,दुष्काळामुळे ऊस उत्पादन घटल्याने कारखान्याला उपलब्ध होणाऱ्या उसावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा गाळप हंगाम फेब्रुवारी महिन्यापर्यंतच सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.गाळपाचा कालावधी कमी झाल्यास ऊसतोड मजूर, वाहतूकदार आणि संबंधित व्यवसायांनाही त्याचा फटका बसू शकतो.

वृंदिका राजपुतची राष्ट्रीय लॉन टेनिसमध्ये सुवर्णभरारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर वृंदिका राजपुत हिने राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.दिल्ली येथे झालेल्या या स्पर्धेतील तिच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे महाराष्ट्रासह मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्राकडून लॉन टेनिसच्या वैयक्तिक प्रकारात राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक जिंकणारी ती मराठवाड्यातील पहिली खेळाडू ठरली आहे. केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण मंत्रालयामार्फत आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या पाच सदस्यीय संघात वृंदिकाची निवड झाली होती.सांघिक प्रकारात महाराष्ट्राला उपांत्यपूर्व फेरीत तामिळनाडूच्या संघाकडून पराभव स्वीकारावा लागला. मात्र, या अपयशाने खचून न जाता वृंदिकाने वैयक्तिक स्पर्धेत आपली ताकद दाखवून दिली. उपांत्य फेरीत तिने तामिळनाडूच्या खेळाडूचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात तिच्यासमोर महाराष्ट्राच्याच प्रार्थना खेडकरचे आव्हान होते. चुरशीच्या झालेल्या या लढतीत वृंदिकाने ७-५ अशी बाजी मारत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. सांघिक प्रकारातील पराभवानंतर वैयक्तिक स्पर्धेत मिळवलेले हे यश तिच्या जिद्दीचे आणि खेळातील कौशल्याचे दर्शन घडवणारे ठरले.वृंदिकाने वयाच्या सहाव्या वर्षापासून लॉन टेनिस खेळण्यास सुरुवात केली. लहान वयापासून घेतलेले प्रशिक्षण, नियमित सराव आणि स्पर्धांमधील अनुभवाच्या बळावर तिने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हे तिचे पहिले राष्ट्रीय विजेतेपद आहे.यापूर्वी अखिल भारतीय टेनिस संघटनेतर्फे आयोजित विविध स्पर्धांमध्ये तिने विजेतेपदे मिळवली आहेत. तसेच, सोळा वर्षांखालील आशियाई कनिष्ठ गटातील स्पर्धेतही तिने विजेतेपद पटकावले आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदकामुळे तिच्या क्रीडा कारकिर्दीला नवी दिशा मिळाली आहे. टेनिसमध्ये देशासाठी मोठी कामगिरी करण्यासोबतच भविष्यात अभियंता होण्याचे स्वप्नही ती बाळगून आहे.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विभागीय क्रीडा संकुलातील मुख्य प्रशिक्षक रमय्या, प्रवीण गायसमुद्रे आणि आशुतोष मिश्रा यांनी अभिनंदन केले. वृंदिकाच्या सुवर्णकामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

घोडेगाव कुकाणा रोडवरील खड्डे बुजवण्याचे काम निकृष्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

घोडेगाव - घोडेगाव ते कुकाणा या रस्त्यावरील देवगाव ते कुकाणा दरम्यान रोडवरील खड्डे बुजवण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलं जात असून रस्त्यावर अनेक ठिकाणी अर्धवटच खड्डे बुजवण्यात आले असल्याचा आरोप केला जात आहे.

देवगाव ते कुकाणा हा रस्त्याचे काम जवळपास ३० वर्ष पूर्ण होऊन गेले आहे त्यामुळे या रस्त्यावर मोठाले खड्डे पडले होते आणि या खड्ड्यांमुळे वेळोवेळी अपघात होत असल्याने या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मागणी आमदार विठ्ठलराव लंघे यांच्याकडे करण्यात आली लंगे यांच्या सूचनेवरून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम हाती घेण्यात आले परंतु संबंधित ठेकेदाराकडून हे खड्डे बुजवण्याचे काम अतिशय निकृष्ट करण्यात येत असून पडलेल्या खड्ड्यातील माती मुरूम स्वच्छ न करता त्याच मातीवर कमी प्रमाणात डांबर टाकून खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आलं आहे तसेच या रस्त्यावर अजूनही अनेक मोठाले खड्डे असुन केवळ थातुर्मातुर काम करून बिल काढण्याचा ठेकेदाराकडून प्रयत्न केला जात आहे. तरी या रस्त्यावरील सर्व खड्डे बुजवून दर्जेदार काम करण्याची मागणी परिसरातुन होत आहे.

देवगाव ते कुकाणा हा रस्ता जवळपास तीस वर्षांपूर्वी झाला होता त्यानंतर या रस्त्यावर नवीन कोणतेही काम झालेलं नसल्यामुळे या रस्त्याला मोठाले खड्डे पडले होते सध्या हे खड्डे बुजवण्याचं काम अतिशय निकृष्ट दर्जाचं होत आहे.

भाऊसाहेब मोरे
माजी चेअरमन देवगाव सोसायटी

देवगाव ते कुकाणा दरम्यान असलेल्या रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आल्यानंतरही रस्त्यावर अर्धवट राहिलेले खड्डे (छाया - सोपान भगत)

तरुणावर चाकूने वार

सहा जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : शिवीगाळ केल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून सहा जणांनी मिळून २३ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना गंगापूर शहरातील राजीव गांधी चौकाजवळ घडली. या हल्ल्यात दत्तू संतोष भक्कड हा तरुण गंभीर जखमी झाला. हल्लेखोरांपैकी एकाने त्याच्या पोटावर, पाठीवर, कानाजवळ आणि डोक्याजवळ चाकूने वार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी गंगापूर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, सहा आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २८ ऑक्टोबर बुधवार रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता शहरातील राजीव गांधी चौकाजवळील बंडू यांच्या चहाच्या हॉटेलच्या ओट्याजवळ ही घटना घडली. आरोपी आतिष गायकवाड याने दत्तूला, 'सकाळी तू मला आणि राहुल फुलारे याला शिवीगाळ का केली होती?' असा जाब विचारला. त्यानंतर आरोपींनी दत्तूला शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण केली.दरम्यान, राहुल फुलारे याने हातातील चाकूने दत्तूच्या पोटावर, पाठीवर, कानाजवळ आणि डोक्याजवळ वार करून त्याला गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेमुळे राजीव गांधी चौक परिसरात खळबळ उडाली.या प्रकरणी जखमीच्या आई छाया संतोष भक्कड (वय ४०, रा. सखारामपंतनगर, गंगापूर) यांच्या फिर्यादीवरून राहुल फुलारे, आतिष गायकवाड, पवन गायकवाड, करण शिंदे, चेतन गायकवाड आणि विशाल कापसे या सहा जणांविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४९१/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९(१) यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक पाटील करीत आहेत.

सिंहस्थ ध्वजारोहण सोहळ्यासाठी नाशिकमध्ये कडेकोट सुरक्षा; ड्रोन उड्डाणावर बंदी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण जिल्ह्यात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तेरा आखाड्यांचे प्रमुख महंत या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याने संभाव्य धोके टाळण्यासाठी ड्रोन उड्डाण, ड्रोनद्वारे छायाचित्रण व चित्रीकरण यांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. सार्वजनिक सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

नाशिक येथे ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास देशाच्या राष्ट्रपतींसह मुख्यमंत्री आणि विविध आखाड्यांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे कार्यक्रमस्थळासह परिसरातील सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ध्वजारोहणानंतर सायंकाळी महागोदाआरतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २९ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजून १ मिनिटापासून ते ३१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीपर्यंत ड्रोन उडविण्यास बंदी घालण्यात आली आहे. ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रण, चित्रीकरण किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा वापर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. रामकुंड, गोदाघाट आणि देवमामलेदार मंदिर परिसरासह शहरातील संवेदनशील भागांमध्ये विशेष दक्षता घेण्यात येत आहे.

ड्रोनबरोबरच पॅराग्लायडर, पॅरामोटर, हॉट एअर बलून, मायक्रोलाइट विमान आणि तत्सम हवाई साधनांच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. पोलीस आयुक्तांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय अशा साधनांचे उड्डाण करता येणार नाही. संभाव्य हवाई हल्ल्यांचा धोका आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दी लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीतही ३० आणि ३१ ऑक्टोबर रोजी ड्रोन उड्डाण व पॅराग्लायडिंगवर बंदी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातही सुरक्षेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेतली जाणार आहे. ध्वजारोहण सोहळ्यासाठी भाविक, नागरिक, साधू-महंत आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची उपस्थिती अपेक्षित असल्याने पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, ध्वजारोहण सोहळा सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने विविध यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. भाविकांनी आणि नागरिकांनी सुरक्षा निर्बंधांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गंगापूरच्या माऊली नगरमध्ये ३२ वर्षीय युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : शहरातील माऊली नगर परिसरात राहत्या घरात गळफास घेऊन ३२ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना २८ ऑक्टोबर रोजी रात्री उघडकीस आली. नारायण हरिकिसन लाहाणे (वय ३२, मूळ रा. वाकोद, ता. फुलंब्री) असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नारायण लाहाणे हे माऊली नगर येथे विजय साबणे यांच्या घरात भाड्याने राहत होते. ते जामगाव रोडवरील पंचगंगा सीड्स कंपनीत कामाला होते, तर त्यांची पत्नी एका खासगी रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्यरत होती. हे दाम्पत्य चार वर्षांच्या मुलीसह राहत होते. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते रात्री ९ वाजेदरम्यान नारायण यांनी घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला होता. रात्री साडेनऊच्या सुमारास पत्नी कामावरून घरी परतली. तिने दरवाजा ठोठावून तसेच दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. काही वेळाने त्यांचा दूरध्वनीही बंद झाल्याने पत्नी चिंताग्रस्त झाली. तिने मध्यरात्री १२ वाजता गंगापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी नारायण हे छताच्या पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. त्यांना तातडीने खाली उतरवून गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश जाधव पुढील तपास करीत आहेत.

मोटार सायकल वरून आलेल्या दोन भामट्यांनी रोख रक्कम व मोबाईलची पिशवी घेऊन ठोकली धूम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : पाठीमागुन मोटारसायकलवर आलेल्या दोन अज्ञात भामट्यांनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा असलेल्या हातातील रोख रक्कम व मोबाईल असलेली पिशवी हिसकावून धुम स्टाईलने चोरी केल्याची घटना राहुरी शहरातील भर बजार पेठेत घडली.

भारती मच्छींद्र रिंगे, वय ४७ वर्षे, ह्या राहुरी तालुक्यातील मालुंजे खुर्द येथील रहिवाशी असून त्या बचत गट अध्यक्षा म्हणुन काम पाहतात. दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास भारती रिंगे व त्यांचे पती मच्छिंद्र रिंगे हे दोघेजण बचत गटाचे महीन्याचे गोळा झालेले पैसे भरण्यासाठी राहुरी येथे आले. मच्छिंद्र रिंगे यांना कोर्टात काम असल्याने भारती रिंगे ह्या त्यांचा पुतन्या नारायण नामदेव रिंगे याच्या मोटारसायकलवर बसून दुपारी २.१५ वाजे दरम्यान कोर्टातुन सेंट्रल बँकेकडे पैसे भरण्यासाठी जात होते. ते आडव्या पेठेतील प्रगती शाळेच्या जवळ असताना त्यांच्या पाठीमागुन एका मोटरसायकलवर दोन अज्ञात भामटे आले. त्यांनी भारती रिंगे यांच्या हातातील ३२ हजार रुपए रोख रक्कम व एक मोबाईल असलेली कापडी पिशवी बळजबरीने ओढुन घेतली. त्यावेळी काही तरुणांनी त्या भामट्यांचा पाठलाग केला. परंतू भामटे राहुरी फॅक्टरीच्या दिशेने सुसाट वेगात निघून गेले.

घटनेनंतर भारती मच्छींद्र रिंगे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून दोन अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. १२००/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) प्रमाणे रस्तालूटीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे. भर पेठेत व भर दुपारी झालेल्या या रस्तालूटीच्या घटनेमुळे महिला वर्गात प्रचंड भिती निर्माण झाली आहे.

वैजापूरमध्ये नगरपरिषदेची धडक मोहीम

१२० किलो प्लास्टिक जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : शहरात एकल वापर प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांवर लक्ष केंद्रित करत गुरुवारी वैजापूर नगरपरिषदेने धडक मोहीम राबवली.शहरातील मॉल, बाजारपेठेतील दुकाने, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते आणि विविध व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करून सुमारे १२० किलो एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले. प्लास्टिकमुक्त शहराच्या दिशेने नगरपरिषदेने हे पाऊल उचलले आहे.

एकल वापर प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणारे नुकसान रोखण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने ही तपासणी मोहीम हाती घेतली. शहरातील विविध भागांतील व्यावसायिक आस्थापनांची पाहणी करत प्लास्टिकचा साठा आणि वापर तपासण्यात आला. या कारवाईदरम्यान संबंधित दुकानदार व विक्रेत्यांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या.

प्लास्टिकचा कचरा नाल्यांमध्ये साचणे, स्वच्छतेच्या समस्या निर्माण होणे आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होणे, अशा समस्या टाळण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक आहे. व्यापारी, दुकानदार, फेरीवाले आणि नागरिकांनी एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावेत, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.मुख्याधिकारी भागवत बिघोत प्लास्टिकविरोधातील मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले.

निधनवार्ता

अर्चना नेहे

संगमनेर : तालुक्यातील सावरगाव तळ येथील सौ अर्चना शांताराम नेहे (वय ४५) यांचे नुकतेच आकस्मित निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सासरे, दीर, भाया, जावा असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी आणि व्यापारी शांताराम नेहे यांच्या पत्नी होत.

जगन्नाथ ढाले

सोनई-नेवासा तालुक्यातील बेल्हेकरवाडी येथील जगन्नाथ हरी ढाले (वय ७७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुलगी, एक भाऊ सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रघुनाथ ढाले यांचे ते जेष्ठ बंधू तर बाबासाहेब व शिवाजी ढाले यांचे ते वडील होत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा
शुक्रवार दि. ३० ऑक्टोबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१-२०-४९

कल्याण
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८-७५-२९

मुंबैम (मेन)
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४-९७-१०

माधुरी बाजार डे / नाईट

१३८ ३४५ ६७९	२-९	१२६ २८९ ४६८	२९-५२-१६-९२-०८

२-५-७

शुभ लाभ

Date	Mon			Tue			Wed			Thu			Fri		
27/07/2026 to 31/07/2026	259	60	550	590	42	228	358	62	390	400	47	890	160	70	488
03/08/2026 to 07/08/2026	234	90	569	170	85	159	338	42	129	460	09	478	370	05	348
10/08/2026 to 14/08/2026	577	99	234	230	53	148	250	70	235	355	39	135	133	76	358
17/08/2026 to 21/08/2026	240	60	460	278	73	346	116	82	480	156	23	779	449	77	179
24/08/2026 to 28/08/2026	360	96	790	255	23	229	789	42	237	450	98	440	266	41	290
31/08/2026 to 04/09/2026	149	43	670	170	81	560	159	52	336	690	50	235	577	99	135
07/09/2026 to 11/09/2026	680	47	557	228	27	124	570	26	358	112	43	779	445	33	689
14/09/2026 to 18/09/2026	789	47	124	336	20	136	799	56	178	680	42	345	399	16	790
21/09/2026 to 25/09/2026	390	25	348	457	62	129	480	23	599	166	30	479	150	60	280
28/09/2026 to 02/10/2026	669	19	135	137	18	279	260	84	257	660	29	126	369	84	770
05/10/2026 to 09/10/2026	140	57	250	459	85	168	130	48	567	469	99	126	558	84	590
12/10/2026 to 16/10/2026	160	79	568	290	11	669	122	58	189	130	46	123	257	42	480

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१३४	१२८
८६	१३
६००	१५७

निशाणी नंबर ८२
दिनांक १२/१०/२०२६
नेमलेली तारीख ०४/११/२०२६

जाहिर समन्स

ॲड. जी. डी. खिळदकर
नेवासा

२ रे नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी.
रे.मु.नं ९९४/२०१२
यांचे कोर्टात...

वादी- नंदु सुदाम माळी
प्र.वादी-भिमाबाई सुदाम माळी

ज्या अर्थी वादी यांनी नेवासा येथील मा. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी. यांचे न्यायालयात प्र.वादी विरुध्द दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्र.वादी नं. ६अ सुलाबाई सुरेश माळी रा. अंदरसुल, ता. येवला, जि. नाशिक यांना बऱ्याच वेळा त्यांच्या राहत्या घराच्या पत्त्यावर समन्स काढूनही त्या मिळुन आलेल्या नाहीत व त्या मे. कोर्टात हजर झालेल्या नाहीत. म्हणुन तुम्ही कोर्टात हजर राहावे म्हणुन तुम्हास या जाहिर समन्सने कळविण्यात येत आहे की,

ज्या अर्थी प्र.वादी नं. ६अ सुलाबाई सुरेश माळी रा. अंदरसुल, ता. येवला, जि. नाशिक यांना या समन्स ने कळविण्यात येते की, आपण पुढील नेमलेली तारीख ०४/११/२०२६ स्वतः अगर आपले माहितगार वकिलामार्फत या मे. कोर्टात हजर राहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा आपणास सदर दाव्यात कुठल्याही प्रकारे म्हणणे द्यावयाचे नाही असे ग्राह्य धरुन आपणाविरुध्द एकतर्फी हुकूम पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/१०/२०२६ रोजी माझे सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

नेवासा — **कनिष्ठ लिपिक (दिवाणी न्यायलय, नेवासा)** — शिक्का — **हुकूमावरून सहा अधिक्षक (दिवाणी न्यायलय, नेवासा)**

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY DAUGHTER BIRTH CERTIFICATE IN OLD NAME MUSARRAT BURHAN SHAIKH (MOTHER NAME) (BEFORE NAME) TO NEW NAME AS MAHEMUSARRAT BURHAN SHAIKH (AADHAAR NO.MOTHER- 8654-3231-6541) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE : SHRIRAMPUR DATE : 29/10/2026

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME SHAIKH SAKEENA HAROON (EDUCATION DOCUMENTS) (BEFORE NAME) TO NEW NAME AS SAKINA MAZAR SAYYAD (AADHAAR NO.- 5679-0962-7012) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE : KOPARGAON DATE : 29/10/2026

बिरोबा देवस्थानच्या होईकात पुढील वर्षी देखील दुष्काळाचे सावट

निमगाव वाघा येथे पारंपरिक होईक सोहळा; पाऊस, शेती आणि पशुधनाविषयी व्यक्त केली चिंता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील प्रसिद्ध बिरोबा देवस्थान येथे पारंपरिक धार्मिक प्रथेप्रमाणे नुकताच होईक (भविष्यवाणी) सोहळा पार पडला. या वेळी देवाचे भगत नामदेव भुसारे यांनी आगामी काळातील पाऊस, शेती, पशुधन आणि भूगर्भातील जलसाठ्यांबाबत पारंपरिक भाकीत मांडले. 'काळी आईची वाफ होईल', म्हणजेच दुष्काळाची तीव्रता कायम राहून जमिनीतील पाणीसाठे कमी होण्याची शक्यता असल्याचे संकेत होईकातून देण्यात आल्याचे सांगण्यात आले. आगामी काळात पाच ते सात खंडांमध्ये परिस्थिती कठीण होण्याचे भाकीतही यावेळी करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिरोबा देवस्थान येथे झालेल्या होईकात पावसाचे अनिश्चित स्वरूप, शेतीसमोरील आव्हाने आणि पशुधनावरील संकट यांचा उल्लेख करण्यात आला. तीन खंडांत आभाळ फिरेल, मात्र काही ठिकाणी पाऊस होईल तर काही ठिकाणी पावसाची प्रतीक्षा कायम राहील, असे पारंपरिक भाकीत सांगण्यात आले. यामुळे पेरणी, पिकांची वाढ आणि ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

शेती आणि पशुधनाला संकटाचा सामना करावा लागू शकतो, असेही होईकात सांगण्यात आले. 'लक्ष्मी'चा उल्लेख पशुधन आणि शेतीच्या संदर्भात करण्यात आला. पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असा अर्थ या भाकितातून व्यक्त करण्यात आला.

ज्वारीची पेरणी होण्याचे संकेत देतानाच मुगाच्या पेरणीचा मार्ग कठीण राहील, असेही सांगण्यात आले. दिवाळीच्या सुमारास तसेच पुढील काही कालखंडांत काही भागांत पाऊस होण्याची शक्यता असल्याचे पारंपरिक भाकीत मांडण्यात आले. मागील वर्षी दहा खंडांत चळवळ होण्याचे भाकीत करण्यात आले होते. सध्या विविध क्षेत्रांत आंदोलन आणि चळवळी सुरू असल्याने त्या भाकिताची ग्रामस्थांमध्ये चर्चा होत असल्याचे सांगण्यात आले. तसेच सोन्याच्या भावात मोठी वाढ होण्याबाबत केलेले भाकीतही खरे ठरल्याचा दावा उपस्थितांकडून करण्यात आला.

यंदाच्या होईकात आगामी काळातील अडचणी, पावसाची अनिश्चितता आणि काही विनाशकारी घटनांचे संकेत दिल्याचे सांगण्यात आले. 'दिनमान काळा होईल', या उल्लेखातून आगामी काळात अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर सत्याचा विजय होईल, असेही भाकीत मांडण्यात आले.

देवाचे भगत नामदेव भुसारे यांनी होईक सांगताना पारंपरिक विधी केला. त्यांच्या अंगात वारे संचारल्यानंतर त्यांनी स्वतः च्या अंगावर वेताचे फटके ओढत भविष्यवाणी सांगितली. सकाळी बिरोबाच्या ओव्या सादर करण्यात आल्या. गावातील पशुहत्याबंदीच्या परंपरेचे पालन करून देवाला भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखविण्यात आला.

निमगाव वाघा येथील बिरोबा देवस्थानच्या होईक सोहळ्याला परिसरात पारंपरिक महत्त्व आहे. दरवर्षी या सोहळ्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील ग्रामस्थ एकत्र येतात. होईक ऐकण्यासाठी आणि धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यासाठी यंदाही भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या होईक सोहळ्याच्या आयोजनासाठी ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, नामदेव जाधव, बाबासाहेब जाधव, गोकुळ जाधव, साहेबराव बोडखे, बबन कापसे, बाबा जाधव, बाबा पुंड, अंशाबापू शिंदे, संजय डोंगरे, संजय कापसे, ठकाराम शिंदे, बाळू भुसारे, युवराज भुसारे, पांडुरंग गुंजाळ, राजू भुसारे, अंबादास निकम, कचरू कापसे, भागचंद जाधव, विजय भुसारे, रामदास वाखारे, गुलाब जाधव, गणेश भुसारे, सुरेश जाधव, अण्णा जाधव, नवनाथ जाधव, अतुल फलके, राजेंद्र डोंगरे, अरुण कापसे, रावसाहेब भुसारे आदींनी सहभाग घेतला.ी अपेक्षा व्यक्त होत आहे.

द•ख•ल

संजय गलांडे आदर्श कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित

हातगाव : पाथर्डी तालुक्यातील निंबादैत्यनांदूर येथील जय भगवान युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय सामाजिक आदर्श कार्य गौरव पुरस्कार शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील संजय रामभाऊ गलांडे यांना जाहीर होऊन त्याचे वितरण नुकतेच निंबादैत्यनांदूर येथे विविध मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले आहे.जय भगवान युवा प्रतिष्ठानच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येत असून सामाजिक क्षेत्रात कायम पुढाकार घेऊन गोर - गरीब व तळागळातील नागरिकांना त्यांच्या ज्वलंत प्रश्नासाठी न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना सदरचा पुरस्कार जाहिर करण्यात येत असून त्याचे वितरणही दिमागदार सोहळ्यात करण्यात येत आहे अशी माहिती जय भगवान युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अजिनाथ भगवान दहिफळे यांनी दिली असून या वेळी हातगाव येथील शंकर भराट,अंकुश गवळी, बाबासाहेब भालेराव,गोरख कदम, बद्रीनाथ बर्गे, बाळासाहेब बावणे,शुभम अभंग,अतुल उदावंत, नितीन निर्मळ,बिबन शेख,माऊली कवडे यांच्यासह इतरही ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान संजय गलांडे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे हातगावसह परिसरातून अभिनंदन होत आहे.

कर्जाच्या जाचाने बाभुळवाडे येथील शेतकरी दिपक खणकर यांची आत्महत्या

निघोज : पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील शेतकरी दिपक शंकर खणकर (वय वर्षे ५३) यांनी बुधवार दि. २८ रोजी शेतातील राहत्या घरी आत्महत्या करीत जिवणयात्रा संपवली. त्यांच्या पश्चात

पत्नी दोन मुले असा परिवार आहे. अवघी दिड एकर शेती ती सुद्धा जिरायत त्यातच सोसायटी, पतसंस्था व खाजगी अशाप्रकारे दहा लाखाचे कर्ज फेडायचे कसे. पाउस पाणी नाही. कर्जाचे व्याज आणी त्यातच कर्जदारांचा तगादा पत्नी तसेच दोन मुलांना व त्यांना सारखा सुरु होता. कर्जदारारांच्या नोटीसा येत होत्या. संस्थेचे वसुली अधिकारी सातत्याने तगादा करण्यासाठी घरी हेलपाटे मारीत होते. मात्र आज नाही उद्या देतो असे करीत करीत पैसे आणायचे कुठून एक तर जमीन जिरायत ती सुद्धा दिड एकर मुले मोठी झालीत मात्र नोकरी नाही अशी परिस्थिती असल्याने दिपक खणकर यांनी शेवटी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. पत्नी व दोन्ही मुले रोजंदारीवर गेले असताना खणकर यांनी आत्महत्या केली आहे. घरचे ज्यावेळी घरी आले त्यावेळी त्यांच्या हा प्रकार लक्षात आला. दिपक यांनी तोपर्यंत जिवनयात्रा संपवली होती. पारनेर पोलिस अधीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास सुरू आहे.

समर्थ फार्मसी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन खो-खो व कबड्डी स्पर्धा

निघोज : डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे आणि समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो-खो व कबड्डी स्पर्धा आणि निवड चाचणी समर्थ क्रीडा संकुल बेल्हे येथे उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत उद्द-ढण, लोणेरेच्या संघांनी खो-खो व कबड्डीच्या मुलांच्या आणि मुलींच्या अशा चारही गटांत विजेतेपद पटकावून वर्चस्व सिद्ध केले. या स्पर्धेत समर्थ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेचा प्रारंभ हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमापूजनाने व सरस्वती पूजनाने झाला. यावेळी क्रीडा संचालक प्रा. एच.पी. नरसुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळातील शिस्त, सातत्य, सांघिक भावना, खिलाडूवृत्ती आणि क्रीडा क्षेत्रातील संधी यांचे महत्त्व विशद केले. विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. खो-खो मुलांच्या गटात उद्द-ढण, लोणेरे विजेता, तर एईएस कॉलेज ऑफ फार्मसी, बारामती उपविजेता ठरले. मुलींच्या गटात उद्द-ढण, लोणेरेने विजेतेपद, तर नवसह्याद्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नायगाव (नसरापूर) यांनी उपविजेतेपद मिळवले. कबड्डी मुलांच्या गटात उद्द-ढण, लोणेरे विजेता, तर डेलोनिक्स सोसायटीचे बारामती कॉलेज ऑफ फार्मसी उपविजेता ठरले.

जैन सोशल फेडरेशनच्या फराळ महोत्सवातून सर्वसामान्यांची दिवाळी गोड करण्याचे काम : भंडारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : सर्वसामान्यांपासून ते श्रीमंत कुटुंबांपर्यंत प्रत्येकाला दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा, या उद्देशाने जैन सोशल फेडरेशन संचलित स्टेशन रोड येथील भगवान महावीर भवन येथे सलग १४ व्या वर्षी दिवाळी फराळ महोत्सवाला प्रारंभ झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर माफक दरात, स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणात तयार केलेला दर्जेदार फराळ उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यंदाही सुरू ठेवण्यात आला आहे.

या उद्घाटनप्रसंगी बडी साजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सतीश (बाबुशेठ) लोढा, संतोष बोथरा, डॉ. विजय भंडारी, डॉ. प्रकाश कांकरिया, सुनील मालू, आनंदऋषीजी नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, माणकचंद कटारिया, सतीश मुनोत (भोसरी), गिरीश गांधी, मिलापचंद पटवा, प्रकाश पटवा, अमित पटवा, रुपेश पटवा, आर्यन पटवा आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, भगवान महावीर भवनातील फराळ महोत्सवात स्वच्छता आणि आरोग्याची काळजी घेऊन फराळाची निर्मिती केली जाते. दर्जेदार फराळ माफक दरात उपलब्ध करून देत सर्वसामान्यांची दिवाळी गोड करण्याचे काम पटवा परिवार करत आहे. सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात येणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, महावीर भोजनालयाच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला.दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि आनंदाचा सण नसून माणसांना प्रेमाने जोडणारा उत्सव आहे. गेल्या १४ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला हा महोत्सव सामाजिक जिव्हाळा, विश्वास आणि सेवाभाव जपणारा उपक्रम ठरला आहे.

बंद शिवपांदण शेतरस्ते मोकळे होणार? प्रशासनाची चक्रे वेगाने फिरू लागली!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्ह्यातील बंद पडलेले शिवपांदण व शेतरस्ते मोकळे करण्याच्या मागणीने आता वेग घेतला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी हक्काचे रस्ते उपलब्ध करून देणे, शेतरस्त्यांचे सीमांकन करणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. 'मिशन झिरो पेंडन्सी'अंतर्गत या प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कुळकायदा शाखेमार्फत जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना देण्यात आले आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे बंद असलेले शेतरस्ते खरोखरच मोकळे होणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र राज्य शिवपांदण रस्ता चळवळ समितीचे अध्यक्ष शरद भाऊसाहेब पवळे यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले होते. या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन जिल्हास्तरावर बैठक आयोजित करावी आणि शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली होती.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी शिवपांदण व शेतरस्ते अतिक्रमणामुळे किंवा अन्य वादांमुळे बंद असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक, शेतीची मशागत आणि इतर कृषी कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समितीने निवेदनात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व बंद शिवपांदण व शेतरस्ते खुले करावेत, शेतरस्त्यांचे अधिकृत सीमांकन करून कायमस्वरूपी हद्दखुणा निश्चित कराव्यात, तसेच वहिवाटीच्या शेतरस्त्यांची रुंदी गाव नकाशावर कायदेशीररीत्या नोंदवावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय शेतकऱ्यांना बारमाही आणि सुरक्षित वाहतुकीसाठी हक्काचे सिमेंट काँक्रीटचे शेतरस्ते उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करावा, अशीही मागणी समितीने केली आहे.

मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांसह तीव्र ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य शिवपांदण रस्ता चळवळ समितीने दिला होता.

चोरीचा छडा न लागल्यास रास्ता रोको आंदोलन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

टाकळी ढोकेश्वर : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे झालेल्या घरफोडी प्रकरणातील चोरांचा तात्काळ छडा लावून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करावा अन्यथा येत्या बुधवारी दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता वासुंदा चौक येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मंगल संतोष गोरडे व टाकळी ढोकेश्वर येथील महिलांनी पोलीस प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

टाकळी ढोकेश्वर येथील मंगल गोरडे यांच्या घरात २५ ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली होती.या घटनेत घरातील दहा तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास झाली.या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात तत्काळ फिर्याद देण्यात आली होती मात्र घटनेला पाच दिवस उलटूनही पोलिसांकडून या चोरीचा तपास लागलेला नाही किंवा चोरीस गेलेला ऐवजही हस्तगत झालेला नाही.

या चोरीमुळे गोरडे कुटुंबीयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण कुटुंबात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार मागणी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने गोरडे कुटुंबीयांना तीव्र मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. टाकळी ढोकेश्वर व परीसरात या अगोदरही अनेक छोट्या मोठया चोरीच्या घटना घडल्या असुन झालेल्या चोऱ्यांचा काहीही तपास लागलेला नाही व मुद्देमाल ही मिळालेला नाही यामुळे पोलिसांनी कार्यक्षमता दाखवून तात्काळ कार्यवाही करून चोरांचा शोध घ्यावा व चोरी गेलेला ऐवज कुटुंबियांना परत मिळावा अशी जोरदार मागणी महिलांनी यावेळी केली अन्यथा दि.४ नोव्हेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे सांगितले.या संबंधीचे लेखी निवेदन यावेळी टाकळी ढोकेश्वर दूरक्षेत्र व पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.

यशवंत गाडे विद्यालयात घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : नगर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने मुकुंदनगर (फकिरवाडा) येथील यशवंत माध्यमिक विद्यालय येथे घनकचरा व्यवस्थापन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, ओला व सुका कचरा, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, '७ आर' संकल्पना तसेच कचऱ्याचा योग्य पुनर्वापर व पुनर्चक्रण याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेत स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वच्छ शाळा, सुंदर परिसर आणि हरित भविष्य यांचा संदेश देण्यात आला. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक संगीता बनकर व सत्राच्या मार्गदर्शक सुवर्णा वाघ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

जलजीवन नव्हे ही तर ठेकेदारांसाठी जलसंपत्ती योजना

लाभार्थ्यांचा आनंद भंडारी समोर तक्रारीचा पाऊस

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

कर्जत : कर्जत तालुक्यातील योजना ही जलजीवन नसून ती फक्त संबंधित ठेकेदारांसाठी जलसंपत्ती योजना ठरली आहे. अनेक ठिकाणची कामे अत्यंत नित्कृष्ट झाली असून कोणत्या आधारे ठेकेदारांना बील अदा केले जाते हा देखील प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. त्यामुळे साहेब आपण आला आहात तर केवळ बैठकीचा फार्स करू नका. ज्या ठेकेदारांनी चुकीचे कामे केली त्यांच्यावर शासकीय पैसाचा अपव्ययाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी जलजीवन योजनेच्या लाभार्थी नागरिकांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी समोर कैफियत मांडली. गुरुवारी कर्जतच्या पंचायत समिती सभागृहात आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांच्या उपस्थितीमध्ये कर्जत तालुक्यातील जलजीवन योजनेची आढावा बैठक संपन्न झाली. यात जवळपास सर्वच लाभार्थी गावाच्या नागरिकांनी तक्रारीचा पाऊस पाडला.

कर्जत तालुक्यातील जवळपास ९८ गावात केंद्र सरकारच्या माध्यमातून हर घर जल या टॅगलाईन खाली जलजीवन योजना सुरू करण्यात आली असून तब्बल पाच वर्षे झाली पण बहुतांश गावात या योजनेचा बोजवारा दिसत आहे. यंदा पडलेल्या दुष्काळामुळे जलजीवन योजनेची अनियमितता उघडी पडली आहे. या योजनेत संबंधित लाभार्थी नागरिकांनी तक्रारीचा पाऊस पाडल्याने त्या

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीला जलजीवनच्या ठेकेदारांची दांडी

कर्जत तालुक्यातील ९८ गावात जलजीवन योजनेची कामे सुरू आहेत. यातील काही कामे पूर्ण झाली, काही प्रगती पथावर आहेत. मात्र उपस्थित तक्रारीचा आढावा घेताना सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी ठेकेदारांची विचारणा केली असता अनेक काम करणारे ठेकेदारच अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. याबाबत स्वता भंडारी यांनी नाराजी व्यक्त करीत तालुका प्रशासनास यावर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

अनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी तालुकानिहाय आढावा घेण्याचे पाऊले उचलली आहे. गुरुवार, दि २९ रोजी आनंद भंडारी यांनी कर्जत तालुक्याचा आढावा घेतला. यात ९८ गावांच्या तब्बल ९० टक्के लोकांनी जलजीवन योजनेच्या कामावर आक्षेप नोंदवत केवळ शासकीय पैशाचा अपव्यय असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर फोटोसह सत्य परिस्थिती योग्य पुराव्यासह मांडल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देखील अवाक झाले. कर्जत पंचायत समितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून गावनिहाय आढावा घेताना कामाच्या सत्य परिस्थितीची चौकशी केली असता अनेक काम करणारे ठेकेदारच बैठकीस अनुपस्थित असल्याचे समोर आल्यानंतर आनंद भंडारी यांचा पारा चांगलाच चढला. काम करणारे ठेकेदार अनुपस्थित असल्याचा अनुभव फक्त कर्जत तालुक्यातच अनुभवायास मिळाला असल्याची शोकांतिका त्यांनी व्यक्त केली. कोट्यवधीच्या कामाचे गांभीर्यच या लोकांना नाही का ? असा सवाल उपस्थित करीत कानपिचक्या दिल्या.

जेथे तक्रारी प्राप्त झाल्या तेथे चौकशी समितीने वस्तुस्थितीबाबत सत्य अहवाल मांडावा. या योजनेवर लाखो- करोडो रुपये खर्च झाले पण त्या योजनेचा फायदा ग्रामस्थांना होत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यानी देखील आपलं आत्मपरीक्षण करावं असा सूर सदरच्या बैठकीत मांडत नियुक्त केलेल्या समितीने तात्काळ आपली माहिती सादर करण्याच्या सूचना केल्या.

दखल

केंद्रीय भूमी संसाधन विभागाचे सचिव दिलीप कुमार आज पाणलोट विकास कामांची करणार पाहणी

पुणे : केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाचे सचिव दिलीप कुमार (भा.प्र.से.) हे महाराष्ट्रातील 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० ' अंतर्गत सुरू असलेल्या जलसंधारण व पाणलोट विकासाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी शुक्रवार , दि. ३० ऑक्टोबर रोजी पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते पुणे जिल्ह्यातील खेड प्रकल्पांतर्गत वरुडे, गुळाणी, वाफगाव आणि कन्हेरसर या गावांतील पाणलोट क्षेत्रातील कामांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये मंजूर १४० पाणलोट प्रकल्पांसाठी १,२५१.११ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, दि. २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १,०५७.५३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळे या प्रकल्पांची आर्थिक प्रगती ८५ टक्क्यांवर पोहोचली आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त गजानन पवार यांची भूमी फाउंडेशनला भेट

पुणे : मुंबई येथून नुकतीच बदली होऊन स्वारगेट विभाग, पुणे येथील सहाय्यक पोलीस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारलेले गजानन पवार यांची भूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास पवार व पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली.यावेळी डॉ.कैलास पवार व पदाधिकाऱ्यांच्या वतीने गजानन पवार साहेब यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत-सत्कार करण्यात आला. तसेच स्वारगेट विभागाच्या नवीन जबाबदारीबद्दल त्यांना मनः पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.भूमी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याला गजानन पवार साहेब यांचे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्यपूर्ण सहकार्य व सकारात्मक मार्गदर्शन लाभत आले आहे. विशेषतः गरजू व वंचित मुलींसाठी राबविण्यात येणाऱ्या निवासी प्रकल्पाच्या सामाजिक कार्याला त्यांनी वेळोवेळी मदतीची भूमिका घेतली आहे. या सदिच्छा भेटीदरम्यान भूमी फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा झाली.समाजातील गरजू घटकांसाठी सुरू असलेल्या सेवाभावी कार्याला भविष्यातही सतत सहकार्य व मार्गदर्शन मिळेल अशी सहाय्यक पोलीस आयुक्त पवार यांनी इच्छा व्यक्त केली.यावेळी भूमी फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गांधी विचार संस्कार परीक्षेत २६०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

वाघोली, पुणे : विद्यार्थ्यांमध्ये महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता, शांतता व नैतिक मूल्यांची रुजवात व्हावी, या उद्देशाने गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने आयोजित 'गांधी विचार संस्कार परीक्षा २०२६' भारतीय जैन संघटना माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाघोली येथे उत्साहात पार पडली.इयत्ता पाचवी ते बारावीतील २६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला.

महात्मा गांधींचे जीवनकार्य, विचार, स्वावलंबन, सामाजिक जबाबदारी व राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, यासाठी विविध संदर्भपुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी तयारी केली. गांधी विचार संस्कार परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये व सामाजिक बांधिलकी रुजविण्याचा विद्यालयाचा प्रयत्न असून, विद्यालय मागील तीन वर्षांपासून या उपक्रमात सातत्याने सहभागी होत आहे. या परीक्षेतील सहभाग हा 'गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिते'साठीही महत्त्वाचा घटक आहे.

पिण्याचे पाणी आणि शेतीच्या नियोजनासाठी समन्वयाने काम करा- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पाणी वापराबाबत व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश

दीर्घकालीन पाणीपुरवठा योजनेचा पाठपुरावा

शहर पाणीपुरवठा योजना आणि एकूण पाणी वापराचा कोटा निश्चित करण्यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेऊन पाठपुरावा सुरू आहे. बैठकीत चर्चा करून निश्चित करण्यात आलेल्या पाणी आवर्तनाच्या नियोजनाची अंम लबजावणी करावी. त्यानंतर डिसेंबर-जानेवारीमध्ये परिस्थितीचा पुन्हा आढावा घेण्यात येईल. सर्वांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही श्रीमती पवार यांनी स्पष्ट केले.

पाणीवाटपात कोणावरही अन्याय होणार नाही, यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करा – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

पाणीवाटपात कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पाणी वितरणाचे योग्य नियोजन करून शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी शहर आणि ग्रामीण भागातील सर्व लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आणि जलसंपदा विभागाने समन्वयाने काम करण्याची गरज आहे. भविष्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा अशा सूचना देवून पिण्याच्या पाण्याच्या नियोजनात १० टक्के पाणी बफर म्हणून राखून ठेवण्याचा निर्णय शासनाकडून यापूर्वीच घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, सुनील शेळके, ज्ञानेश्वर कटके, हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे, बाबाजी काळे, शंकर जगताप, राहुल कुल, शंकर मांडेकर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीत या विषयाचा सविस्तर आढावा घेतला जात असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार उपलब्ध पाण्याचे नियोजन करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. अल निनोच्या संभाव्य परिणामांबाबत गेल्या सहा महिन्यांपासून चर्चा सुरू असून पाण्याच्या नियोजनाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत चर्चा करताना पुणे महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करून प्रभावी नियोजन करावे. तसेच पुणे महानगरपालिकेला १३ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. तसेच खडकवासला धरण प्रणालीतील पाणीसाठ्याचा विचार करून म हानगरपालिका आणि जलसंपदा विभागाने पारदर्शक पद्धतीने नियोजनाची अंमलबजावणी करावी.पाणी वापराबाबत जनजागृती आवश्यक आहे.पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाणीकपात आणि अधिक पाणी वापरणाऱ्या उपक्रमांबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेनेही पाणी नियोजनाबाबत आवश्यक दक्षता घ्यावी, असे निर्दे श त्यांनी दिले.

यंदा पावसाळ्यात खरीप पिकांचे उत्पादन कमी झाले आहे. त्यामुळे आगामी रब्बी हंगामासाठीही पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शेती आणि शहरातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे समन्यायी नियोजन करावे. पिण्यासाठी आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे, पाण्याचा पुनर्वापर, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि सर्व लाभधारकांना समान संधीने पाणी उपलब्ध करून देणे, या बाबींना प्राधान्य देऊन संबंधित विभागाने कार्यवाही करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पिण्याचे पाणी आणि शेतीच्या पाणी नियोजनाबाबत झालेल्या बैठकीत उपस्थित आमदार आणि लोकप्रतिनिधींनी विविध महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

बैठकीला उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच जिल्हा परिषद, कृषी व पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सांस्कृतिक वारसा संवर्धनाच्या नव्या पर्वाचा 'बाप्पाचा कट्टा' उपक्रम

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते पुणे येथे शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव जपत, सांस्कृतिक वारसा संवर्धनाच्या उद्देशाने 'बाप्पाचा कट्टा' हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमाचा फर्ग्युसन महाविद्यालय येथे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. कलारसिक, साहित्यप्रेमी, संस्कृतीरक्षक, गणेश भक्त व सर्व नागरिकांनी बाप्पाचा कट्टा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. आशिष शेलार यांनी केले.

यावेळी अभिनेते प्रवीण तरडे, Bappp.org चे व्यवस्थापकीय संचालक श्रीपाद अष्टेकर उपस्थित होते. श्री.शेलार म्हणाले, राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने यावर्षी गणेशोत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यात आला. या म होत्सवाअंतर्गत देशात व राज्यात तालुका स्तरापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. यावर्षी दुबईम ध्ये देखील राज्य महोत्सव साजरा करण्यात आला. या महोत्सवाची वर्ल्ड युनोस्को कडे वाटचाल असून सुरु आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या bappa.org उपक्रमांतर्गत 'बाप्पाचा कट्टा' हा ९० दिवसांचा सांस्कृतिक महाउत्सवात या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबे, मित्रमंडळी आणि कलाकारांना कलागुण सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. उखाणे, मंगळागौरीचे खेळ, भोंडला, पोवाडे, विविध लोककला, मराठी म्हणी, अंताक्षरी अशा पारंपरिक कलाप्रकारांसह आधुनिक कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

गणेशोत्सव धार्मिक, श्रद्धेचे अधिष्ठान आहे.या उत्सवाला राष्ट्रीय व सामाजिक उपक्रमांची जोड देण्यात आली आहे. कला, साहित्य, रंगसंगती यांचा सुंदर मिलाप इथे पाहायला मिळतो. Bappa.org हे व्यासपीठ सर्व जगभरातील गणेश भक्तांना आपल्या कथा सांगण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लोकसंस्कृती टिकवायची असेल तर मराठी भाषा जोपासली पाहिजे : डॉ.उल्हास पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : वारकरी सांप्रदाय संतांच्या विचारांचा वारसा जपणारा ज्ञान समृद्ध सांप्रदाय आहे. हा सांप्रदाय समता, बंधुभाव आणि शिस्तीची जगातील सर्वांत मोठी परंपरा जपतो. त्यामुळे कीर्तनातून संत विचारांचे शुद्धपणे प्रबोधन होणे गरजेचे आहे. आपली अभिजात लोकसंस्कृती टिकवायची असेल तर मराठी भाषा जोपासली पाहिजे. असे विचार जेष्ठ साहित्यिक आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट वीजपुरवठा; महावितरणचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई/ पुणे : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या सौरऊर्जानिर्मिती योजनेत निर्माण झालेली अतिरिक्त वीज तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी मोठ्या वीज मागणीच्या वेळी वापरण्यासाठी महावितरणने १००० मेगावॅट अवरचा टप्पा गाठला आहे. देशात प्रथमच विकेंद्रित स्वरुपात बॅटरीचा वापर करून इतका मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करण्यात येत असून राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे वाढलेल्या वीजमागणीच्या काळात हा वीजपुरवठा अत्यंत उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेमचेंजर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज कृषीपंपांना देण्यात येते. अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी कमाल वीज मागणीच्या वेळी देण्यासाठी महावितरणने सुरु केलेल्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) योजनेत ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यातून दोन तास वीजपुरवठा होणार असल्याने १००० मेगावॅट अवर इतकी बीईएसएस क्षमता उपलब्ध झाली आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या बॅटरी स्टोरेज योजनेतून सर्वच वीजग्राहकांना लाभ होत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाला असून त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत.

परिणामी विजेची उच्चांकी मागणी होत आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा पुरेसा व किफायतशीर दरात वीजपुरवठा होत आहे. सायंकाळी सौरऊर्जेचा पुरवठा बंद झाल्यानंतर वीज पुरवठा करण्यासाठी अधिक दराने वीज विकत घ्यावी लागते. अशा स्थितीत महावितरणच्या पुढाकाराने सुरू झालेल्या १००० मेगावॅट अवर क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पामुळे दिलासा मिळू लागला आहे.

महावितरणने एकूण ७५० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी साठवणूक प्रकल्प उभारण्याची योजना सुरू केली असून त्यातून दोन तासांसाठी प्रत्येकी ७५० मेगावॅट अर्थात एकूण १५०० मेगावॅट अवर वीज उपलब्ध होईल. त्यापैकी १००० मेगावॅट अवरचे काम पूर्ण झाले आहे.

ऊर्वरित काम डिसेंबरअखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. याखेरीज ४००० मेगावॅट अवर क्षमतेचे प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे सायंकाळी उच्चांकी मागणीच्या वेळी हमखास वीज उपलब्ध होणे आणि बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर दरात उपलब्धता असे दोन लाभ आहेत. आगामी उन्हाळ्यात या योजनेचा सर्वाधिक लाभ होईल.

जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक २६/२०२६-२७ दिनांक-२७/१०/२०२६

नियोजित वैष्णव कॉम्पलेक्स सहकारी गृहरचना संस्था मर्या..
पत्ता- गट नं. १२८/२, प्लॉट नं.५. गट नं. १२९/३, प्लॉट नं. १५. १६. २१. संभाजीनगर, सहयोग सोसायटी मागे, जळोची, ता. बारामती, जि. पुणे.
तर्फे मुख्यप्रवर्तक श्री बबन पोपट शिंदे, अर्जदार
विरुध्द

१) मे. श्रीहरी डेव्हलपर्स बारामती, भागीदारी फर्म तर्फे एक अधिकृत भागीदार श्रीहरी भिमराव धपाटे, रा. विश्वकर्मा हौसिंग सोसायटी, सुर्यनगरी, जळोची, ता. बारामती, जि. पुणे
२) श्री नामदेव मारूती शेळके, पत्ता-रा. माउलीनगर, जळोची, ता. बारामती, जि. पुणे
३) मच्छिंद्र शिवा तपकीरे, पत्ता- रा. तपकिरे इस्टेट, भिगवण रोड, जळोची, ता. बारामती, जि. पुणे

जाबदेणार

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १६/११/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही. असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
ठिकाणः पुणे.
दिनांक: २७/१०/२०२६

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पुणे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळवण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक समीर दादामियाँ पिंजारी रा. खुर्शिद मंजिल, ज्ञानदिप कॉलनी, ग्रेट पंजाब हॉटेल जवळ, काळेवाडी, पुणे ०१८, जमीर दादामियाँ पिंजारी रा. गाजिया अपार्टमेंट, रूम नं. १०, सरस्वती शाळेजवळ, शिवाजीनगर, ठाणे वेस्ट, ठाणे, नागनाथ भारत रावे रा. महात्मा फुले नगर, भोसरी, पुणे ३९ यांचे खरेदी मालकी ताबे वहीवाटीची आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, बोजाविरहीत असल्याने सदरील मिळकत आमचे अशिल नवेद वाजिद शेख, जहेद सुजाउर रहेमान शेख, अजिंक्य श्रीनिवास शिंदे यांना विक्री करण्याचे निश्चित केलेले असुन सबब सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध अथवा अन्य इतर तबदिलीचा लेखी अथवा तोंडी करार इ. असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन आठ (८) दिवसांचे आत पुराव्यासह खालील पत्त्यावर हक्काबाबत लेखी हरकत घ्यावी. आमची हरकतीबाबत खात्री पटवुन दयावी अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही हक्कहितसंबंध नाही. असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. परिशिष्ट मिळकत गाव मौजे मोशी, ता. हवेली, जि. पुणे येथिल मिळकत गट नंबर ४५८ (जुना सर्वे नं. ४५६) क्षेत्र ०५ हे २० आर + पो.ख. ०१ हे ७२ आर, एकुण ०६ हे ९२ आर, आकार ०३ रू. ०० पै. यापैकी खाते नं. ७४७९ वरिल क्षेत्र ०० हे ००.७८ आर, खाते नं. ७४८१ वरिल क्षेत्र ०० हे ००.६२ आर, खाते नं. ७४८२ वरिल क्षेत्र ०० हे ००.७९ आर यांसी एकत्रित चर्तुः सिमा पुर्वेस - याच गटातील खाजगी अंतर्गत लेआउट मधील अंतर्गत प्लॉट नंबर ७ही मिळकत, दक्षिणेस याच गटातील खाजगी अंतर्गत लेआउट मधील अंतर्गत प्लॉट नंबर ५ ही मिळकत, पश्चिमेस याच गटातील खाजगी अंतर्गत लेआउट मधील अफजल कुरेशी यांची मिळकत, उत्तरेस याच गटातील खाजगी अंतर्गत लेआउट मधील अंतर्गत २४ फुट रुंदीचा रस्ता यांची मिळकत येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत ही या जाहीर नोटीसचा मुख्य विषय असे.

खरेदी घेणारातर्फे
ॲड. अमोल रामदास टाकळकर
ऑफीस राजगुरूनगर कोर्टाजवळ, ता. खेड, जि. पुणे.
मो.नं.८२०८७१७०३४

जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक २५/२०२६-२७ दिनांक-२७/१०/२०२६

नियोजित चंद्रमा अपार्टमेंट सहकारी गृहरचना मर्या.
पत्ता- सर्वे नंबर ६३२ ते ६८५, प्लॉट नंबर १४, व्हिल कॉलनी, टि.सी. कॉलेज रोड, बारामती, ता. बारामती, जि. पुणे.
तर्फे मुख्यप्रवर्तक श्री सुरेश दशरथ साळवे, अर्जदार
विरुध्द

मे. अमोल कन्ट्रक्शन बारामती, भागीदारी फर्म तर्फे अधिकृत भागीदार
१) नामदेव बबनराव गायकवाड,
२) श्री अनिल नामदेवराव गायकवाड
३) श्री सुनिल नामदेवराव गायकवाड वरील १ ते ३ रा. टकारकॉलनी, बारामती, ता. बारामती, जि. पुणे
४) श्री रजणीकांत इसाक राठोड तर्फे वारस
अ) नितीन रजणीकांत राठोड
ब) निरंजन रजणीकांत राठोड
क) सविता डेव्हीड गायकवाड
ड) सतीश रजणीकांत राठोड
रा. वसंतनगर, आठ नंबर शाळेच्या समोर, बारामती, ता. बारामती, जि. पुणे

जाबदेणार

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १६/११/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही. असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
ठिकाण: पुणे.
दिनांक: २७/१०/२०२६

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पुणे.

ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि.पुणे
बी-१ निविदा सूचना -२/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि. पुणे येथे मौजे श्रीरामनगर येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि.प यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. ३०/१०/२०२६ सकाळी.१०.०० ते ०६/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि १६/११/२०२६ रोजीसकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडून	इसारा रक्कम	कोरे निविदा रक्कम	कामाचा कालावधी	ठेकदार वर्ग
१	मौजे श्रीरामनगर येथे बालभवन सुधारणा करणे	२९९९५६/-	२५५२०२/-	२५५२/-	२३६/-	६ महिने	खुला
२	मौजे श्रीरामनगर येथे बालभवन येथे भिंत / ग्रील जाळी बसवणे	४९९९७२/-	४२४०२७/-	४२४०/-	२३६/-	६ महिने	खुला
३	मौजे श्रीरामनगर येथे धोंडे आळी सिमेंट रस्ता करणे	२९९९९८/-	२५४४६२/-	२५४५/-	२३६/-	६ महिने	खुला
४	मौजे श्रीरामनगर येथे गणेश धोंडे घर सिमेंट रस्ता करणे	४९९९९६/-	४२४१०२/-	४२४१/-	२३६/-	६ महिने	खुला
५	मौजे श्रीरामनगर येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे	४९९८२१/-	४२५३६९/-	४२५४/-	२३६/-	६ महिने	खुला
६	मौजे श्रीरामनगर येथे स्मशानभूमी सुधारणा करणे	४९९९९१/-	४२४०४३/-	४२४०/-	२३६/-	६ महिने	खुला
७	मौजे श्रीरामनगर येथे बालभवन सुधारणा करणे	४९९९९८/-	४२४४२४/-	४२४४/-	२३६/-	६ महिने	खुला
८	मौजे श्रीरामनगर येथे स्मशानभूमी वेटिंग शेड बांधणे	४९९६११/-	४२६२७८/-	४२६३/-	२३६/-	६ महिने	खुला
९	मौजे श्रीरामनगर येथे स्मशानभूमी वेटिंग शेड सुधारणा करणे	४९९५९९/-	४२३७३६/-	४२३७/-	२३६/-	६ महिने	खुला
१०	मौजे श्रीरामनगर येथे बंदिस्त (मागासवर्गीय वस्ती) गटर करणे	१४९८६०/-	१२७०००/-	१२१७/-	२३६/-	६ महिने	सु.बे.अ.
११	मौजे श्रीरामनगर येथे बंदिस्त (अनुसूचित जाती वस्ती) गटर करणे	१४४९७८/-	१२२८६३/-	१२२९/-	२३६/-	६ महिने	सु.बे.अ.
१२	मौजे श्रीरामनगर येथे बंदिस्त (अनुसूचित जाती वस्ती) गटर करणे	४९९९९२/-	१२२८६३/-	१२२९/-	२३६/-	६ महिने	सु.बे.अ.
१३	मौजे श्रीरामनगर येथे बंदिस्त गटर करणे	४९९९९२/-	४२३७२२/-	४२३७/-	२३६/-	६ महिने	सु.बे.अ.
१४	मौजे श्रीरामनगर येथे रस्ता दुरुस्ती करणे	२९९९९९/-	२५४४६१/-	२५४५/-	२३६/-	६ महिने	सु.बे.अ.
१५	मौजे श्रीरामनगर येथील झुळूक वस्तीकडे जाणारा रस्ता करणे	६४९९९९/-	५४८५७६/-	५४८६/-	५९०/-	६ महिने	सु.बे.अ.

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश/ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत श्रीरामनगर

जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की बबन बाळू कुंभार, राहणार एस पी एम स्कूल जवळ सेक्टर नं. २१ स्कीम नं. सहा यमुना नगर निगडी पुणे -४११०४४

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH -14 -DC-8609 असा असून सदर दोन चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती शिल्पा बबन कुंभार यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-२९/१०/२०२६

श्रीमती शिल्पा बबन कुंभार,
एस पी एम स्कूल जवळ सेक्टर नं. २१ स्कीम नं. सहा यमुना नगर निगडी पुणे४११०४४

जाहिर नोटीस

तमाम जनतेस सुचीत करणेत येते की, मे. कमलराज रिअल्टर्स यांच्या द्वारे सूचित करणेत येते की, कमलराज इंद्रधनू सर्व्हे नं: - ८३/३ (पै), ८३/५/१/१३ व ८३/५/१/१४ मौजे - दिघी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे, येथील, रहिवासी गृहप्रकल्पास राज्य शासनाच्या पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र यांच्याकडून पत्र क्र. EC ID NO. EC26C3801MH5133852N दिनांक 27/10/2026 नुसार पर्यावरण विषयक परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे. सदर परवानगीच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून **http://parivesh.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पुणे **दिनांक: 30/10/2026**

ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि.पुणे
बी-१ निविदा सूचना -२/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि. पुणे येथे मौजे श्रीरामनगर येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने नोदणीकृत पुरवठादार/संस्था/ठेकेदार यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. ३०/१०/२०२६ सकाळी १०.०० ते ०६/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात, सदर निविदा दि १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उभारण्यात येतील.

अ.क्र.	कामाचे नाव	परिणाम	कामाचा कालावधी	अनामत रक्कम	ठेकदार वर्ग
१	मौजे श्रीरामनगर येथील सर्व मिळकतीचे फेर आकारणी करणे, मिळकत जिओ फेन्सिंग करणे व मिळकत नकाशे तयार करून मिळणेबाबत.	प्रति मिळकत दर	१ महिना	५०००/-	पुरवठादार/संस्था ठेकेदार
२	मौजे श्रीरामनगर येथे घरातून कचरा संकलन करणे वाहतूक, वाहन व मनुष्यबळ उपलब्ध करणे.	प्रतिमाह	६ महिने	५०००/-	पुरवठादार/संस्था ठेकेदार

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंबर की) रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कंश/ऑनलाईन/डीडी लिफाफा नं १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत श्रीरामनगर

द•ख•ल

शहरटाकळी जिल्हा परिषद शाळेत आकाश कंदील कार्यशाळे ला उस्फूर्त प्रतिसाद

शहरटाकळी : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये (केंद्र: देवटाकळी,) नुकतीच अत्यंत उत्साही वातावरणात 'आकाश कंदील बनवणे कार्यशाळा व स्पर्धा' संपन्न झाली. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील सृजनशीलता वाढवण्यासाठी या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर, आकर्षक आणि नाविन्यपूर्ण आकाश कंदील तयार केले. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती नरवडे मॅडम यांनी या स्पर्धेचे परीक्षण करून प्रत्येक गटातून उत्कृष्ट तीन क्रमांक निवडले. अध्यक्षांच्या वतीने सर्वविजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांच्या कलाकुसरीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसंदर्भात मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. या सुंदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर, शेख सर, इंगळे सर, श्रीमती निकाजी मॅडम आणि बलफे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला असून पालकांकडूनही शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्पेलिंग बी स्पर्धेत स्वराज खोसे जिल्ह्यात प्रथम

निघोज : जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित स्पेलिंग बी स्पर्धा नुकतीच अहिल्यानगर येथे संपन्न झाली. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी या स्पेलिंग बी स्पर्धेचे आयोजन शिक्षण विभागाकडून केले होते. इयत्ता तिसरी चौथी गटातील

स्पेलिंग बी स्पर्धेत पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी स्वराज मल्हारी खोसे यांने अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर बाजी मारली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या शुभ हस्ते स्वराज खोसे यास यावेळी सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील मराठी शाळेत शिकणाऱ्या या विद्यार्थ्याने स्पेलिंग बी स्पर्धेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. पारनेर तालुक्यातील डोंगरदऱ्यात वसलेल्या पाडळी दर्या गावातील प्राथमिक शाळेतील या विद्यार्थ्यांने इंग्रजी भाषेवर विशेष प्रभुत्व असल्याने ,आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या बळावर या यशाला गवसणी घातली आहे. या स्पर्धेसाठी त्यास वर्गशिक्षक शिवाजी पानसरे , शाळेचे मुख्याध्यापक राजू कोल्हे, पदवीधर शिक्षिका वैशाली औटी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल केंद्रप्रमुख गणेश नगरे, विस्तार अधिकारी जयश्री व्होरा, गटशिक्षणाधिकारी विनेश लाळगे यांनी अभिनंदन केले आहे.

हातगावात नळ पाणी पुरवठा करण्यासाठी जोडलेल्या पाईपची चोरी

हातगाव : शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे ग्रामपंचायतीमार्फत गावाला सार्वजनिक नळ पाणी पुरवठा करण्यासाठी अधिग्रहण करण्यात आलेल्या बोअर पासून पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीपर्यंत टाकण्यात आलेल्या पाईपची अज्ञात चोरट्यांनी चोरी केली असल्याबाबतची रीतसर तक्रार शेवगाव पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आला आहे.हातगाव ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी संजय लक्ष्मण दारूणकर व प्रशासक वावरे यांनी सदर घटनेबाबत आदल्या दिवशी पोलिसांना पत्र दिले होते त्यानंतर दुसऱ्या दिवशी दाखल केलेल्या एन सी आर तक्रारीमध्ये म्हटले आहे की, हातगाव गावास गेली अनेक वर्षापासून पाणी पुरवठा करणारी जी सार्वजनिक नळ पाणी पुरवठ्याची विहीर आहे.त्या विहिरीने तळ गाठला असल्याने गावातीलच द्रौपदाबाई अशोक बटूळे यांचा बोअर अधिग्रहण करून त्या ठिकाणाहून नळ पाणी पुरवठ्याच्या विहिरीपर्यंत ४५० फूट अंतर असलेल्या एचडीपीइ बँच न. २०२६०७ ची २ इंची असनाऱ्या २० हजार रुपये किमतीच्या पाइपची अज्ञात चोरट्यांनी चोरी केलेली असल्याचेही पोलिसांमध्ये दिलेल्या तक्रारीमध्ये ग्रामविकास अधिकारी दारूणकर यांनी म्हटले आहे.

श्रीगोंदा तालुक्यात चोरट्यांचा सुळसुळाट; शहरापासून ग्रामीण भागापर्यंत चोऱ्यांचे सत्र!

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र समोर येत आहे. शहरात बांधकामासाठी आणलेले स्टील आणि विविध साहित्य चोरट्यांकडून लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी आहेत. ग्रामीण भागात विद्युत मोटारी, स्टार्टर, मोटारींच्या केबल, सोलर प्लेट, तसेच डाळिंब, कापूस, मका यांसारखा शेतीमाल चोरीला जात असल्याचे प्रकार घडत आहेत. त्यातच मोबाईल आणि दागिन्यांच्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.तालुक्यातील काही ठिकाणी वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शेतातील विद्युत मोटारी, स्टार्टर आणि केबल चोरीला गेल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याबरोबरच सिंचन व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. सोलर प्लेट आणि शेतीमाल चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत आहेत. बांधकामाच्या ठिकाणांवरील साहित्य चोरीलाही आळा बसत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. आठवडे बाजारही चोरट्यांच्या निशाण्यावर! श्रीगोंदा शहरासह परिसरातील आठवडे बाजारात मोबाईल आणि दागिने चोरीच्या घटनांबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. बाजारात खरेदीसाठी मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होत असल्याने चोरट्यांना संधी मिळत असल्याची शक्यता आहे. गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी सावध राहण्याची गरज असतानाच, अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांची गस्त आणि प्रभावी देखरेख वाढविण्याची मागणी होत आहे. पोलिसांच्या सक्रियतेबाबत प्रश्नचिन्ह चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वारंवार चोरी होणाऱ्या ठिकाणांची माहिती संकलित करून त्या परिसरात गस्त वाढविणे, आठवडे बाजारात साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती करणे, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करणे आणि चोरीच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने पूर्ण करणे आवश्यक आहे.शहर असो वा शिवार, नागरिकांच्या मालमत्तेची सुरक्षा महत्त्वाची आहे. चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालून चोरट्यांना जेरबंद करण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दुष्काळाच्या आगीत होरपळले, शॉर्टसर्किटने ऊसही जळाला!

टाकळी कडेवळीतमध्ये ऊसाला आग; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान; दुष्काळाने कंबरडे मोडले, आगीने उरलीसुरली आशाही जाळली!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : एकीकडे दुष्काळाची दाहकता, दुसरीकडे शेतीचा वाढता खर्च आणि त्यात निसर्गाच्या संकटांची भर अशा दुहेरी कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आता शॉर्टसर्किटच्या आगीने भर घातली आहे. टाकळी कडेवळीत येथे विजेच्या शॉर्टसर्किटमुळे उसाच्या शेताला आग लागून ऊस जळून खाक झाला. गणेश भानुदास भिसे आणि विकास बापू भिसे यांच्या ऊसशेतीचे मोठे नुकसान झाले असून, लाखो रुपयांचा फटका बसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणतात, त्याचा प्रत्यय या घटनेने पुन्हा आला आहे.

टाकळी कडेवळीत येथील गणेश भानुदास भिसे यांच्या गट क्रमांक २८१ मधील ऊस क्षेत्राला, तसेच विकास बापू भिसे यांच्या गट क्रमांक २८३ मधील एक एकर ऊस क्षेत्राला आगीचा फटका बसला. विजेच्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत ऊस जळून खाक झाल्याने दोन्ही शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

ऊस हे शेतकऱ्यांसाठी केवळ पीक नसून वर्षभराच्या कष्टांची आणि आर्थिक नियोजनाची आशा असते. पाणी, खते, औषधे, मजुरी यासाठी हजारो रुपये खर्च करून उभे केलेले पीक आगीत जळताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. दुष्काळामुळे आधीच पिकांच्या भवितव्याची चिंता असताना या आगीने त्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे.

वीज यंत्रणेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

शेतशिवारातून जाणाऱ्या वीजवाहिन्यांची देखभाल आणि संभाव्य शॉर्टसर्किट रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कितपत प्रभावी आहेत, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे. आगीचे नेमके कारण आणि नुकसानीची अधिकृत व्याप्ती तपासणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणेने घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार भरपाई मिळवून द्यावी आणि वीजवाहिन्यांची सुरक्षितता तपासावी, अशी मागणी पुढे येत आहे. दुष्काळाने आधीच होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या उरल्यासुरल्या आशेवरही आगीने पाणी फेरले आहे. आता पंचनाम्यापुरतीच प्रशासनाची भूमिका राहणार, की संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळणार, हा खरा प्रश्न आहे.

बेलगावात पाणी पुरवठा भरती घोटाळ्याविरोधात आमरण उपोषणाचा आठवा दिवस, तरीही प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : तालुक्यातील बेलगाव ग्रामपंचायतीमधील पाणी पुरवठा पदभरती घोटाळा आता चांगलाच पेटला आहे. पंचायत समितीच्या अधिकृत चौकशीत भरती प्रक्रियेतील गंभीर गैरव्यवहार सिद्ध होऊनही दोषींवर कोणतीही कारवाई न झाल्याने, सचिन काकडे हे दिनांक २२/१०/२०२६ पासून बेलगाव येथे आमरण करीत आहेत उपोषणाचा आज आठवा दिवस उजाडला आहे. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने उपोषणकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, त्यांनी प्रशासनाचा निषेध म्हणून आपली आरोग्य तपासणी करण्यास स्पष्ट

नकार दिला आहे.

प्रशासकीय आदेशाला वाटाण्याच्या अक्षता पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी साहेबांनी या संपूर्ण प्रकरणात सविस्तर चौकशी करून सदरची बेकायदेशीर भरती प्रक्रिया रद्द करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, बेलगावचे ग्रामसेवक बीडीओ साहेबांच्या या आदेशाला थेट केराची टोपली दाखवत असल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्ते व ग्रामस्थांनी केला आहे. चौकशी अहवालात दोषींवर ठपका ठेवूनही ग्रामसेवक हेतुपुरस्सर कारवाई टाळत असून प्रशासकीय यंत्रणेलाच आव्हान देत असल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे.

उपोषणकर्ते आणि ग्रामस्थांनी चौकशी अहवालातील अंतिम निष्कर्षातील खालील प्रमुख मुद्द्यांचा आधार घेत संबंधित ग्रामसेवकावर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे: १) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या (उएज) पूर्व परवानगीशिवाय बेकायदेशीर कंत्राटी नोकरभरती सुरू करणे.

२) मूळ जाहिरातच चुकीची आहे,शिक्षणाची अट नियमानुसार ७ वी आहे पण ग्रामपंचायतीने १० वी पास ची अट ठेवल्यामुळे,बरेच उमेदवार या भरती पासून वंचित राहिले.

ग्रामपंचायतीच्या अधिकृत नोंदवही (रजिस्टर), जावक क्रमांक आणि तारखांमध्ये हेतुपुरस्सर खाडाखोड व फेरफार (िंराशिळपस) करणे. ३) ग्रामसेवक मुख्यालयी राहतात नसल्याबाबत तक्रार असून देखील कारवाई होत नाही.

४) मागील ५ वर्षातील विकास कामाबाबत चौकशी समिती स्थापन करण्यात यावी.यासाठी या अगोदर २ वेळा उपोषण देखील केले होते,तरी देखील कारवाई होत नाही.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या वतीने विशेष बँकिंग सेवा शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शिराळ चिचोंडी : सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शिराळ चिचोंडी यांच्या वतीने शिराळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष बँकिंग सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला भारतीय रिझर्व्ह बँक (ठइख), मुंबई येथील श्री. व्यंकट सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिराळ ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. रवींद्र मुळे होते. तसेच श्री. अजय लांडगे रियाज शेख,राजू पोटा हे प्रमुख उपस्थित होते.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शिराळ चिचोंडीचे शाखा व्यवस्थापक श्री. अभिजीत कुलट यांच्यासह गावातील अनेक ग्रामस्थांनी या शिबिरात सहभाग घेतला.

या शिबिरामध्ये ग्रामस्थांना बँकिंग सेवांची माहिती देण्याबरोबरच केवायसी अद्ययावतीकरण, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना तसेच इतर बँकिंग सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या विविध आर्थिक सुरक्षा योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग सेवांशी जोडणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बँकिंग सेवांचा नियमित वापर करण्याचे, विमा योजनांचे महत्त्व समजून घेण्याचे आणि आवश्यक बँकिंग प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन ग्रामस्थांना केले.

जामखेड-मोहा परिसरातील अनधिकृत कला केंद्रांवर कारवाईसाठी आमरण उपोषण!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जामखेड शहर व मोहा परिसरातील कथित अनधिकृत कला केंद्रांवर तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष सचिन दत्तात्रय आजबे यांनी ५ ऑक्टोबर २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. यासंदर्भात वारंवार निवेदने देऊन, उपोषणे करूनही संबंधित केंद्रांवर ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप आजबे यांनी केला आहे.

सचिन आजबे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानुसार, जामखेड शहर व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांबाबत यापूर्वी प्रशासनाकडे तक्रारी करून चौकशीची मागणी करण्यात आली होती. संबंधित कला केंद्रांमधील महिलांची एचआयव्ही तपासणी करावी, अल्पवयीन मुलींना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केले जात असल्याच्या आरोपांची चौकशी करावी, तसेच अमली पदार्थांच्या कथित व्यवसायाबाबतही तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली होती.

या प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीन वेळा उपोषण केले असून, त्यापैकी एक उपोषण नऊ दिवस चालले होते, असा दावा सचिन आजबे यांनी केला आहे. तसेच त्यांच्या लहान भावाने

आत्मदहनाचा प्रयत्न करूनही प्रशासनाने संबंधित कला केंद्रांवर कारवाई केली नसल्याचा आरोप त्यांनी केला. जामखेड तहसील कार्यालयासमोरही सहा वेळा उपोषण करून प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला; मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे आजबे यांनी सांगितले.

संबंधित कला केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वेश्याव्यवसाय आणि डान्सबार सुरू असल्याचा आरोप सचिन आजबे यांनी केला आहे. या केंद्रांच्या मालकांकडून परराज्यातील अनेक मुली व महिलांना आणण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. तसेच केंद्रांमध्ये येणाऱ्या प्रेक्षकांना मारहाण करून त्यांच्याकडून पैसे लुटले जात असल्याच्या तक्रारींची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

पक्षकारांनी लाभ घेत आपल्या प्रकरणाचा निपटारा करावा : प्रांताधिकारी

सोमवारी कर्जतला विशेष महसूल लोकअदालत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

कर्जत : महसूल प्रशासनातील जमीन, रस्ते वहिवाट आणि अन्य महसुली वादांमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा परस्पर संमतीने जलदगतीने निपटारा करण्यासाठी कर्जत-जामखेड उपविभागात सोमवार, दि २ नोव्हेंबरला विशेष महसूल लोकअदालत आयोजित करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिली. या लोक अदालतीमध्ये सर्वसामान्य नागरिकांनी- पक्षकारांनी सहभाग घेत आपल्या अडी-अडचणी, समस्या सोडवाव्यात असे आवाहन केले. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती वर्षाचे औचित्य साधून राज्य सरकारने गेल्या १ सप्टेंबर ते ३१ मार्चदरम्यान महात्मा फुले महसूल लोकअदालत अभियान राबविण्यास मान्यता दिली आहे. महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तडजोडीच्या माध्यमातून जलदगतीने निपटारा करणे आणि नागरिकांना वारंवार होणारी दिरंगाई याकामी दिलासा देणे या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या लोकअदालतीत कर्जत-जामखेड उपविभागांतील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या पात्र प्रकरणांचा समावेश करण्यात येणार असून यात महसुली अपील, रस्ते वहिवाटीचे वाद, वारस नोंदी, जमिनीच्या अधिकार नोंदींशी संबंधित प्रकरणे तसेच ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणांसह अन्य पात्र प्रकरणांचा समावेश असेल लाभ घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित प्रकरणांतील दोन्ही पक्षकारांनी परस्पर संमतीने वाद मिटविण्यासाठी विहित 'प्रपत्र-अ' मध्ये तडजोडनामा अर्ज भरून सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्राप्त अर्जाची छाननी करून संबंधित पक्षकारांची तडजोडीसाठी संमती निश्चित केली जाईल. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तडजोडनामा घेण्यात येईल. लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षकारांच्या संमतीने कायद्यानुसार अंतिम आदेश पारित करून प्रकरणांचा निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिली. त्यामुळे कर्जत-जामखेड उपविभागातील नागरिकांनी सोमवार, दि २ नोव्हेंबर रोजी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

शाळेचे ऋण जपत मायक्रोसॉफ्टच्या अभियंत्याची विद्यार्थ्यांना अनमोल भेट!

अतिश वाळुंज यांच्याकडून वाळुंजवस्ती शाळेतील २० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : ज्या शाळेने आयुष्याला आकार दिला, संस्कारांची शिदोरी दिली आणि यशाच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा दिली, त्या शाळेचे ऋण विसरता कामा नये, ही भावना मनात ठेवून मायक्रोसॉफ्ट कंपनी, पुणे येथे आयटी सॉफ्टवेअर अभियंता म्हणून कार्यरत असलेले वाळुंजवस्तीचे माजी विद्यार्थी अतिश भाऊसाहेब वाळुंज यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट दिली. त्यांच्या वतीने सीएसआर निधीतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाळुंजवस्ती येथील २० विद्यार्थ्यांना ब्लँकेट, पेन आणि ॲक्टिव्हिटी कार्डचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, माजी विद्यार्थ्याच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'आपण शाळेचे देणे लागतो!'

शैक्षणिक साहित्य वाटपामागील भूमिका स्पष्ट करताना अतिश वाळुंज यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास करून शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. शाळा हा आपल्या जीवनाचा पाया असून, विद्यार्थी दशेतच व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो. विद्यार्थ्यांनी उच्च पदांवर पोहोचावे, स्वतःशी प्रामाणिक राहावे, इमानदारीने वागावे आणि मोठे

झाल्यानंतर आपणही आपल्या शाळेसाठी काहीतरी योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

केवळ स्वतःच्या प्रगतीपुरते मर्यादित न राहता आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हातभार लावणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचा आदर्श या उपक्रमातून दिसून आला. माजी विद्यार्थ्याने शाळेशी जपलेले नाते आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याविषयी दाखवलेली आस्था यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.या कार्यक्रमाला ॲड. अशोक वाळुंज, सोसायटीचे चेअरमन अशोक नवले, माजी उपसरपंच फक्कड वाळुंज, माजी चेअरमन विठ्ठल वाळुंज, नितीन वाळुंज, सुभाष वाळुंज, माजी सरपंच अरुण नवले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचींयांचींयासह आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक विजय गायकवाड यांनी केले, तर उपशिक्षक राजेश इंगळे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांनी अतिश वाळुंज यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

प्रगतशील शेतकरी उद्धव नवले यांचे निधन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : भेंडा खुर्द (ता. नेवासा) येथील ज्येष्ठ प्रगतशील शेतकरी उद्धव श्रीपती नवले (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने भेंडा खुर्द परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. उद्धव नवले हे नेवासा तालुक्यात सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व होते. माजी आमदार स्वर्गीय मारुतराव घुले पाटील यांचे ते खंदे समर्थक व निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते.

तालुक्यातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. भेंडा खुर्द ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच वर्षा वैभव नवले यांचे ते सासरे, तर प्रगतशील शेतकरी राजेंद्र नवले व उद्योजक वैभव नवले यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल परिसरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

आठ दिवसांनी पाणी, तरी पाणीपट्टी पूर्णच!

श्रीरामपूर पालिकेच्या सभेत पाणीवाटपातील दुजाभावावरून खडाजंगी; नोव्हेंबरमध्ये आवर्तनासाठी विखे पाटलांची भेट घेणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : शहरातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत असताना पाणीवाटपातील कथित दुजाभाव, रखडलेले साठवण तलावाचे काम आणि प्रशासनाच्या नियोजनावरून श्रीरामपूर नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत जोरदार खडाजंगी झाली. शहराला आठ दिवसांनी पाणीपुरवठा करण्याच्या निर्णयामुळे नागरिकांची गैरसोय होत असताना पाणीपट्टीत सवलत का नाही, असा सवालही उपस्थित करण्यात आला. अखेर नोव्हेंबरमध्येच पाण्याचे आवर्तन मिळावे, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची सर्वपक्षीय शिष्टमंडळ भेट घेणार असल्याचे ठरले.

नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या सभेला उपनगराध्यक्ष कांचन सानप, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. रेल्वे रुळापलीकडील प्रभाग क्रमांक दोनमध्ये दररोज पाणी मिळत असल्याचा, तर अन्य भागांत अपुरा पुरवठा होत असल्याचा आरोप नगरसेवक जितेंद्र छाजेड यांनी केला. पाणीपुरवठ्यात दुजाभाव होत असल्याचा आरोप करत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. मुजफ्फर शेख यांनी या भूमिकेवर आक्षेप घेतला. श्रीनिवास बिहाणी, संजय गांगड, स्नेहल खोरे आणि वैशाली चव्हाण यांनीही पाणीप्रश्नावर आवाज उठविला.

साठवण तलावात केवळ ११ दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असल्याने आठ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. साठवण तलावाचे काम रखडल्याबद्दल आकाश बेग यांनी ठेकेदारावर कारवाईची मागणी केली. मात्र, कारवाईमुळे काम थांबण्याची शक्यता असल्याचे करण ससाणे यांनी सांगितले. डिसेंबरअखेर काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

स्नेहल खोरे यांनी पाणीपट्टीत सवलतीची मागणी केली; मात्र प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे पाणीपट्टी आकारली जात असल्याने सवलत शक्य नसल्याचे मुख्याधिकारी उकिर्डे यांनी सांगितले. बंद बोअरवेल सुरू करणे आणि त्यासाठी कर्मचारी नेमण्याची मागणी श्रीनिवास बिहाणी व आशिष धनवटे यांनी केली. पाणीटंचाईमुळे नागरिक उपोषणाला बसले होते. सभा संपल्यानंतर नगराध्यक्ष करण ससाणे आणि आमदार हेमंत ओगले यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषण सोडविले.

पाणीप्रश्नी तोडगा काढण्यासाठी....

- नोव्हेंबरमध्ये पाण्याचे आवर्तन मिळण्यासाठी विखे पाटलांची भेट.
- साठवण तलावाचे काम डिसेंबरअखेर पूर्ण करण्याच्या सूचना.
- बंद बोअरवेल सुरू करून गरजेनुसार हातपंप व मोटारी बसविण्याची मागणी.
- पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आठ दिवसांनी पाणीपुरवठा.
- पाणीपट्टीत सवलत देण्याची मागणी; प्रशासनाकडून नकार.

राहत्या घरातून तरुणीला पळवले तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील ब्राम्हणी येथील एका तरुणावर काही महिन्यांपूर्वी पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावेळी त्याने सदर मुलीला पळवुन घेवुन जाईल, अशी धमकी दिली होती. त्यानेच आता पिडीत तरुणीचे अपहरण केल्याच्या संशयावरून गुन्हा दाखल करण्यात आला. राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी शेजारील एका गावात पिडीत १८ वर्षीय तरुणी तीच्या कुटुंबासह राहते. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास पिडीत तरुणी तीच्या राहत्या घरातून अचानकपणे बेपत्ता झाली. तरुणीच्या नातेवाईकांनी तीचा आजूबाजूला शोध घेतला, मात्र ती मिळुन आली नाही. तरुणीच्या नातेवाईकांनी काही महिन्यांपूर्वी ब्राम्हणी येथील ओंकार प्रभाकर वैरागर याच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी त्याने सदर मुलीला पळवुन घेवुन जाईल, अशी धमकी दिली होती. त्यामुळे आरोपी ओंकार प्रभाकर वैरागर यानेच पिडीत तरुणीला पळवुन नेल्याचा आरोप तरुणीच्या नातेवाईकांनी केला. पिडीत तरुणीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी ओंकार प्रभाकर वैरागर, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

चांदा रस्तापूर शिवारात शॉर्टसर्किटने दोन एकर ऊस जळून खाक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

चांदा : नेवासा तालुक्यातील चांदा येथील रस्तापुर शिवारातील गट नंबर २४० मधील ज्ञानदेव श्रीमती गायकवाड यांचा शॉर्ट सर्किट होऊन दोन एकर ऊस जळून खास झाला. याबाबत सविस्तर वृत्त असे की चांदा येथील रहिवासी असलेले प्रगतिशील शेतकरी ज्ञानदेव श्रीपती गायकवाड यांचा चांदा रस्तापूर रोड लगत असलेल्या रस्तापुर शिवारातील दोन एकर ऊस शॉर्टसर्किट होऊन जळून खाक झाला गायकवाड यांनी सांगितले की आमच्या शेतात विज वितरण कंपनीचे पोल असून असून त्यावर विज वाहक तारा आहेत परंतु या विज वाहक तारा खूप खाली आहेत आणि त्यांच्यातील अंतर खूप कमी आहे थोडे जरी वादळ आले की लगेच त्या विज वाहक तारांचे पार्कींग होते व विजेचे लोळ खाली पडतात असेच थोडे वादळ झाले त्या वादळात त्या तारांच घर्षण होऊन त्या ऊसामध्ये आगीचे लोळ पडले आणि आमचा ऊस पेटला आता आमचा ऊस मोठा झाला असल्याने काही दिवसांनी त्याला कारखाण्या मार्फत तोड येणार होती पण शॉर्ट सर्किटने ऊस जळाल्याने आमचे फार नुकसान झाले आहे त्यामुळे आमचे झालेल्या नुकसान भरपाई वीज वितरण कंपनीने द्यावी व भविष्यात शॉर्टसर्किट होणार नाही याची दक्षता घेऊन वीज वाहक तारा ओढून पोलला पॅक त्यांच्यामध्ये अंतर ठेवून बांधावीत त्यामुळे पुढील होणारा शॉर्टसर्किटचा धोका दूर होईल अशी मागणी सचिन गायकवाड यांनी केली आहे.

मुठेवाडगाव सोसायटीत सत्तासंघर्ष तीव्र

सहीच्या अधिकारावरून ४ विरुद्ध ८ मते

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मुठेवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीतील सत्तासंघर्षाला वेग आला आहे. सोसायटीच्या चेअरमन द्वारका बाळकृष्ण मुठे यांचे सहीचे अधिकार कमी करण्याच्या मागणीवरून झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चार सदस्यांनी त्यांच्या बाजूने, तर आठ सदस्यांनी विरोधात मतदान केले. उपाध्यक्ष बबनराव मुठे यांना सहीचे अधिकार देण्याच्या मागणीला आठ सदस्यांनी पाठिंबा दिल्याने सोसायटीतील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

मुठेवाडगाव सोसायटीच्या व्यवस्थापन समितीची बैठक आज सकाळी संस्थेच्या कार्यालयात बोलावण्यात आली होती. सभेच्या विषयपत्रिकेवरील मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन झाल्यानंतर संचालक शिवाजी मुठे यांनी मांडलेल्या चेअरमनचे सहीचे अधिकार कमी करण्याच्या विषयावर चर्चा सुरू झाली. हा विषय इतिवृत्तात नोंदवू नये, अशी भूमिका सत्ताधारी संचालकांनी मांडली होती.

मात्र, सहीच्या अधिकाराचा विषय सभेत चांगलाच गाजला. सविस्तर चर्चेनंतर मतदान घेण्याचा निर्णय झाला. मुरकुटे गटातून नुकताच विखे गटात प्रवेश केलेल्या विद्यमान चेअरमन द्वारका मुठे यांच्या बाजूने स्वतः द्वारका मुठे, डॉ. शंकर मुठे, भागवत मुठे आणि संभाजी गोसावी या चार सदस्यांनी मतदान केले. तर उपाध्यक्ष बबनराव मुठे यांना सहीचे अधिकार देण्यात यावेत, या मागणीच्या बाजूने आठ सदस्यांनी कौल दिला. त्यामध्ये बबनराव मुठे, शिवाजी मुठे, सुभाष मुठे, भास्कर मुठे, आण्णासाहेब मुठे, रमेश मुठे, तुकाराम रूपटक्के आणि शकुंतला मुठे यांचा समावेश आहे.

दोन्ही राजकीय गटांकडून दबाव वाढत असल्याने धर्मसंकटात सापडलेले मुरकुटे–ससाणे गटाचे नवनिर्वाचित संचालक, सेवानिवृत्त प्रा. रंगनाथ कोळसे यांनी बैठकीला अनुपस्थित राहून तटस्थ भूमिका घेतली. या घडामोडींमुळे भाजपचे तालुका सरचिटणीस डॉ. शंकर मुठे यांना सोसायटीत एकाकी पाडण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या घडामोडींमध्ये संत तुळशीराम महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ मुठे, सरपंच सागर मुठे, संभाजी ब्रिगेडचे उत्तर जिल्हाध्यक्ष शिवाजी पवार, सोसायटीचे माजी अध्यक्ष गोकुळ मुठे, माजी सरपंच जालिंदर मुठे आणि शेतकरी संघटनेचे संतोष मुठे आदींनी प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. यावेळी राजेंद्र मुठे, किरण मुठे, अनिल मुठे, प्रकाश मुठे, अमोल मुठे, नितीन मुठे, सुनील मुठे, सुनील नेहे, बाळासाहेब भोंडगे, शिवाजी दिघे, भारत शिंदे आणि अशोक रूपटक्के यांच्यासह अनेकजण सोसायटीच्या प्रांगणात उपस्थित होते.

सोसायटीतील सहीच्या अधिकारावरून सुरू झालेला हा संघर्ष आता आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुठेवाडगावच्या स्थानिक राजकारणात या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

‘५० लाख द्या, अन्यथा एमपीडीए–मोक्का लावून तुरुंगात डांबू!’

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर :– ‘५० लाख रुपये द्या, अन्यथा एमपीडीए किंवा मोक्का लावून पाच वर्षे तुरुंगात डांबू,’ अशी धमकी दिली जात असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष तथा सरपंच शरद खंडू पवार यांनी केला आहे. अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांच्यासह संबंधित पोलीस अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच, कथित बेकायदेशीर कारवाई झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयात आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

शरद पवार यांनी २२ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात आपल्यावरील कारवायांमागे राजकीय दबाव असल्याचा आरोप केला आहे. आपण गेल्या १२ वर्षांपासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून, चिंचोडी पाटील परिसरात सरपंच म्हणून तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष म्हणून खा. निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहे. राजकीय विरोधातून आपल्याला अडचणीत आणण्याचे प्रयत्न होत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

नगर तालुका पोलीस ठाण्याकडून राजकीय सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली आपल्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे खोटे व बनावट गुन्हे दाखल करण्यात आले, बेकायदेशीररीत्या जिल्हाबंदीची कारवाई करण्यात आली. कथित अतिक्रमणाच्या प्रकरणातून सरपंचपद रद्द करण्याचा प्रयत्न झाला. आता आपल्याविरुद्ध एमपीडीए आणि मोक्काअंतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचा दावाही त्यांनी निवेदनात केला आहे.

४ मे रोजी दाखल झालेल्या कथित खोट्या गुन्ह्याच्या प्रकरणात उच्च न्यायालयाने आदेश दिल्याचे, तसेच जिल्हाबंदीचा प्रस्ताव प्रांताधिकाऱ्यांनी फेटाळला आहे. सरपंचपदासंदर्भातील कारवाईतही न्यायालयीन हस्तक्षेपामुळे आपले पद कायम राहिल आहे.

आपल्याकडे ५० लाख रुपयांची मागणी करण्यात आली असून, कथित खंडणी न दिल्यामुळे तसेच खा. निलेश लंके यांना संबंधित गुन्ह्यात गोवण्यास नकार दिल्यामुळे आपल्याविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या कारवाया केल्या जात आहे. ही कथित मागणी नेमकी कोणी केली, त्यामागे कोणाचा दबाव होता आणि एमपीडीए किंवा मोक्काअंतर्गत कारवाईची धमकी देण्यामागील कारण काय, याचा सखोल तपास करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

श्रीरामपूर पंचायत समिती इमारत उद्घाटन पुन्हा आचारसंहितेच्या कचाट्यात

७ वर्षापासून रखडले काम ; आता नवीन सदस्य आल्यानंतरच दार उघडणार

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : आरक्षणा च्या मुद्द्यावर रखडलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यास उच्च न्यायालयाने मुभा दिली आहे, या पार्श्वभूमीवर तालुका पंचायत समिती उद्घाटनासाठी पुन्हा एकदा आचारसंहितेच्या कचाट्यात सापडली आहे. आता नवीन सदस्य आल्यानंतरच या पंचायत समितीचे दार उघडणार असल्याचे संकेत आहेत.

तालुका पंचायत समितीच्या २०१९ मध्ये नव्या इमारतीला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात या इमारती चा पाया रचण्यात आला होता. तत्कालीन महसूल राज्यमंत्री आमदार अब्दुल सत्तार यांना आमंत्रित करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी या इमारतीला मध्यंतरीच्या काळात पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला.

तालुका पंचायत समितीच्या या नव्या इमारतीला ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. बांधकाम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. मात्र बॅक टू बॅक लागलेल्या आचारसंहिता, अस्थिर सरकार या पार्श्वभूमीवर ही इमारत पूर्ण होण्यासाठी तब्बल ७ वर्षाचा कालावधी लागला आहे. सध्याची इमारत १९६६ मध्ये बांधण्यात आली आहे. १९७८ व १९८४ मध्ये या इमारतीची दुरूस्ती करण्यात आली होती. मात्र, त्याकाळच्या सोयीनुसार बांधण्यात आलेली ही इमारत जुनी तर झाली आहेच, शिवाय गैरसोयीची आणि अपुरीही पडत आहे. त्यामुळे नवी इमारत बांधणे अत्यावश्यक होते. स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर जिल्हा परिषदेने यासंबंधीचा प्रस्ताव सरकारकडे पाठविला होता. तळ मजला पार्किंग, पहिला आणि दुसरा मजला अशी इमारत बांधण्यात आली आहे.

ग्रीन बिल्डिंग संकल्पनेनुसार ही इमारत बांधण्यात आली आहे. नैसर्गिक प्रकाश योजना, जलपुनर्भरण, पर्यावरणपूर्वक बांधकाम साहित्य, पाणी व वीज यांचा काटकसरीने वापर अशा नियमावलीनुसार ही इमारत आज अनेकांचे लक्ष वेधत आहे.

इमारतीत महिला पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष आणि प्रसाधनगृहही बांधण्यात आले आहे. नियमानुसार दिव्यांगासाठी सुविधाही उभारण्यात आली आहे. २४ जुलै २०१९ ला बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली ही इमारत दोन वर्षांत बांधून पूर्ण करावयाची होती. दरम्यान लाल फितीत संघर्ष करीत ही इमारत लवकरच पूर्णत्वाकडे जाणार आहे. सदस्यांना बैठक व्यवस्था तसेच अधिकारी वर्गासाठी दालन, कर्मचाऱ्यांसाठी टेबल खुर्ची,संगणक व्यवस्था, मीटिंग हॉल साठी बैठक व्यवस्था, स्पीकर, विजेची व्यवस्था आणि अंतर्गत सजावटीच्या फर्निचर कामासाठी हे १ कोटी ९५ लाख रुपये मिळाले आहेत. दरम्यान, कोट्यावधी रुपये खर्चून बांधण्यात आलेली आलिशान अशी इमारत मात्र धुळखात पडली आहे. याबाबत श्रीरामपूर तालुक्यात प्रचंड नाराजी आहे.

रिलच्या भूलभुलैयाने केली शेतकऱ्याची फसवणूक

भेंडीच्या उभ्या पिकातच फिरवला नांगर

अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : एकीकडे ऐन पावसाळ्यात पडलेला उन्हाळा, पावसाने फिरवलेली पाठ दुष्काळाच्या छायेत होरपळणारा शेतकरी, आशेचा किरण असलेले पीक जेव्हा डोळ्यादेखत उद्धस्त होते तेव्हा त्याच्या मनात काय भावना उमटतात याची कल्पना करणे अवघडच, अशीच एक हृदयद्रावक घटना राहाता तालुक्यातील घडली आहे.

शिर्डी येथील साईबाबा एम्प्लॉईज सोसायटी चे चेअरमन तथा कनकूरी येथील शेतीनिष्ठ शेतकरी विठ्ठलराव पवार यांनी दोन एकर क्षेत्रात भेंडीची लागवड केली होती, भरघोस पिकासाठी कोणते वाण घ्यावे यासाठी शोधाशोध सुरू असताना सोशल मीडिया वर त्यांना भरपूर उत्पन्न देणाऱ्या भेंडी पिकाचा रिल निदर्शनास आला त्यांनी त्या बियाणाची चौकशी केली असता बीड येथील नवगण सिडस् यांच्या दुकानातून त्यांनी सोशल मीडियावर पाहिलेल्या एका रीलच्या आधारे कावेरी सीड्स कंपनीचे शुभांका ११ हे भेंडीचे बियाणे खरेदी केले होते, त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की या वाणाला अजिबात व्हायरस येत नाही आणि जवळपास नव्वद तोडे मिळतात, त्यामुळे पवार यांनी विश्वास ठेवून हे महागडे बियाणे घेतले.

सुरुवातीला पीक चांगले दिसत होते, मात्र तिसऱ्या चौथ्या तोड्यापासूनच पिकावर पिवळ्या व्हायरसचा प्रादुर्भाव दिसू लागला, पाने पिवळी पडू लागली, शेंडे आखडू लागले आणि निघणाऱ्या भेंड्या कुबड्या आणि वाकड्या होऊ लागल्या, त्यामुळे बाजारात त्या भेंड्यांना अजिबात मागणी राहिली नाही. पवार यांनी पिक वाचवण्यासाठी नाना प्रकारची औषधे मारली, अनेक फवारण्या केल्या, मात्र कोणत्याही औषधाचा पिकावर परिणाम झाला नाही, पिकाची प्रतिकारशक्ती अजिबात वाढली नाही आणि खर्च मात्र वाढतच गेला. या पिकासाठी त्यांचा पन्नास ते साठ हजार रुपयांचा खर्च झाला होता, ज्यात बियाणे, रासायनिक खत आणि औषधांचा समावेश होता, पण हाती काहीच लागले नाही.

त्यांनी या संदर्भात संबंधित दुकानदाराकडे तक्रार केली असता दुकानदाराकडून केवळ टाळाटाळीची उत्तरे मिळाली, तर कंपनीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कंपनीनेही कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही आणि सहकार्य करण्यास स्पष्ट नकार दिला. यामुळे संतापलेल्या आणि आर्थिक संकटात सापडलेल्या विठ्ठल पवार यांनी अखेर हताश होऊन आपल्या दोन एकरातील उभ्या भेंडी पिकावर चक्क रोटावेटर फिरवून ते उद्ध्वस्त करण्याचा टोकाचा निर्णय घेतला, हा निर्णय त्यांनी मनस्तापातून घेतला.

सोशल मीडियाच्या माध्यमातून जाहिरात करून विकल्या जाणाऱ्या बियाण्यांच्या गुणवत्तेवर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत, कारण शेतकऱ्याच्या मते या कंपन्या रील्सच्या माध्यमातून वेगवेगळ्या पद्धतीने शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत, त्यांनी सांगितले की मक्यासारख्या पिकांमध्येही असाच अनुभव येतो, बियाणे उगवल्यानंतर लगेच त्याला व्हायरस येतो, पाने पिवळी पडायला सुरुवात होते आणि औषध मारूनही मका सुधारत नाही, त्यामुळे यामागे नक्कीच काहीतरी गौडबंगाल आहे असे त्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांनी यापुढे बियाणे घेताना विचार करावा आणि केवळ रील बघून बियाणे खरेदी करू नये असे आवाहनही त्यांनी केले आहे. त्यांनी असेही सांगितले की जसे दुधात भेसळ सापडली तशीच भेसळ या बियाण्यांमध्येही मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि ती भेसळ शासनाने शोधून काढावी, शासनाच्या कृषी विभागाने या कंपन्यांच्या बियाण्यांची आणि औषधांची तपासणी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, या प्रकरणात कृषी विभाग नेमकी काय कारवाई करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे, कारण बियाणे विक्रेत्यांची मनमानी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे बळीराजाचा संयम आता सुटत चालला आहे.

या संदर्भात विठ्ठल पवार यांनी कृषी विभागाकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला असून, एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडेही ऑनलाईन पद्धतीने सर्व माहिती पाठवणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मीडियाच्या माध्यमातूनच शेतकरी जागृत होऊ शकतो, कारण ज्या प्रकारे या कंपन्या मोठ्या जाहिराती करून शेतकऱ्यांची फसवणूक करतात ती फसवणूक थांबवायची असेल तर मीडियाने पुढाकार घेतला पाहिजे, दुष्काळासारख्या परिस्थितीत जर शेतकऱ्याचे कंबरडे मोडणार असेल तर शेतकरी पुन्हा कधीच उभा राहू शकणार नाही. कृषी विभागाने या बियाण्यांची आणि औषधांची कसून तपासणी करून दोषी कंपनी आणि दुकानदारावर कठोर कारवाई करावी.